अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १६३ । शुक्रवार २७ मार्च २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## दीप से दीप जलाते चलो...

**'सहजयोग' भाग ९**



सहजयोगासाठी तुम्हाला काही पैसे द्यायला नकोत. तुम्हाला त्याच्यासाठी काही विशेष मेहनत करायची नाही. काहीच मेहनत नाही. जसं एखादं बी स्वत: उपजतं तसं तुमच्यात बसलेलं बीज अंकुरतं. तुमच्यामध्ये तो अंकुर आहे आणि त्या अंकुराला विद्वानांनी कुंडलिनी हे नाव दिलेले आहे. जसं प्रत्येक बी मध्ये अंकुर असतो तसं तुमच्या प्रत्येकामध्ये ते अंकुर आहे. पण एखादं बी जर किडलेलं असलं किंवा त्या बी मध्ये पूर्णपणे वाढ झालेली नसली, तर मात्र त्या अंकुराला फुटायला वेळ लागतो. आम्ही फक्त त्या बी वर किंवा त्या अंकुरावर आपल्या प्रेमाचे पाणी ओततो. दुसरं काही करत नाही. आणि त्यात तुम्ही तरी काय करणार? बी आपोआपच उगवतं, तसं तुमच्यात असलेला परमेश्वरानी ठेवलेला जो अंकुर आहे तो आपोआपच वर येतो. पण एवढंच आहे, जसा एखादा दीप तुम्ही सजवून ठेवलेला असला तरी तो आपोआप पेटत नाही त्याला एक पेटलेला दीप जवळ आणायला पाहिजे, त्याप्रमाणे सहजयोगातसुद्धा जो दीप पेटलेला आहे तोच न पेटलेल्या दिव्यांना पेटवू शकतो. पण जेव्हा दुसरे दिवे पेटतात तेव्हा ते सुद्धा दुसऱ्यांना पेटवू शकतात. ही अशी क्रिया आहे. **– २५ मार्च १९७७, कळवा**

## महत्त्वाचे..

### सप्तशृंगी गडाकडे जाणाऱ्या भाविकांना कारने चिरडले; महिलेचा मृत्यू

धुळे : सप्तशृंगी गडाकडे पायी चालणाऱ्या भाविकांवर काळाने घाला घातल्याची दुर्दैवी आणि हृदद्रावक घटना घढली. धुळे जिल्ह्यातील शिरपूरकडून सप्तशृंगी गडाकडे पायी जाणाऱ्या भाविकांना चार चाकी वाहनाने चिरडले. या अपघातात एका ३५ वर्षीय महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर दोन भाविक गंभीरित्या जखमी झाले आहेत. अपघातानंतर पायी यात्रेतील इतर बांधवांनी संताप व्यक्त करत तात्काळ जखमींना उपचारासाठी रुग्णालयात नेले. मात्र, उपचारापूर्वीच एका महिलेचा मृत्यू झाल्याची दुखद घटना घडली. अपघातातील जखमींना शासकीय रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले असून आमदार काशीराम पावरा यांनी तात्काळ रुग्णालयात पोहोचून जखमींची विचारपूस केली. शिरपूर तालुक्यातील दहिवद फाटा येथील मुंबई-आग्रा महामार्गावर गुरुवारी ही दुर्घटना घडली.

# ऊर्जा संकटाशी टीम इंडिया म्हणून लढू

- **पंतप्रधान मोदी ॲक्शन मोडमध्ये : आज सर्व मुख्यमंत्र्यांची तातडीची बैठक**
- **इंधन तुटवड्याच्या अफवांवर विश्वास ठेऊ नका : पेट्रोलियम मंत्रालय**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियात इराण-अमेरिका यांच्यात गेल्या चार आठवड्यांपासून सुरू असलेल्या घनघोर युद्धामुळे जगभरात ऊर्जा संकटाची टांगती तलवार निर्माण झाली आहे. भारतावर याचे विपरीत परिणाम होऊ नयेत आणि संभाव्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी केंद्र सरकारने आतापासूनच कंबर कसली आहे. या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रमुखांची व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे महत्त्वाची बैठक बोलावली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच राज्यसभेत बोलताना या युद्धाच्या जागतिक दुष्परिणामांबाबत चिंता व्यक्त केली होती. येणारा काळ कठीण आणि परीक्षेचा असून देशाला एक टीम म्हणून काम करावे लागेल, असे आवाहन त्यांनी सर्व राजकीय पक्षांना आणि राज्यांना केले होते. उद्या होणाऱ्या बैठकीत युद्धाचा सामना करण्यासाठी केंद्र आणि राज्यांनी कोणती रणनीती आखली पाहिजे, यावर सविस्तर चर्चा होणार आहे. विशेष म्हणजे, ज्या राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या आहेत, तेथील मुख्यमंत्री या बैठकीला उपस्थित राहणार नाहीत.

इराणने होर्मुझच्या समुद्रधुनीतून भारतीय जहाजांना मार्ग मोकळा करून दिला असला, तरी देशात इंधन संकटाबाबत मोठ्या प्रमाणात अफवा पसरल्या आहेत. यामुळे अनेक शहरांतील पेट्रोल पंपांवर नागरिकांनी लांबच लांब रांगा लावल्याचे चित्र पाहायला मिळत (पान ४ वर)

### युद्धाचा पेच कायम




**अमेरिका आणि इराणमधील संघर्ष थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शस्त्रसंधीसाठी चर्चा सुरू असल्याचा दावा केला असला, तरी इराणने तो फेटाळून लावला आहे. इराणने ठेवलेल्या अटी जाचक असल्याने हे युद्ध लांबण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या अनिश्चिततेमुळेच भारताने आतापासूनच ऊर्जा सुरक्षेसाठी आपली वितरण प्रणाली अधिक सक्षम करण्यास सुरुवात केली आहे.**

## ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे निधन



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार गुरुवारी पहाटेच्या सुमारास निधन झाले. ते ८५ वर्षाचे होते. ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ, विचारवंत आणि राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचे खंदे पुरस्कर्ते डॉ. जयसिंगराव पवार यांची प्रकृती गेल्या काही दिवसांपासून अस्वस्थ होती. परिणामी त्यांच्यावर रुग्णालयात उपचार देखील सुरु होते. त्यांच्या अकाली निधनाच्या बातमीने मराठेशाहीचा इतिहासकार हरपला अशी भावना व्यक्त केली जात आहे.

डॉ. जयसिंगराव पवार यांचा जन्म ३० डिसेंबर १९४१ रोजी सांगली जिल्ह्यातील तडसर येथे झाला. डॉ. जयसिंगराव पवार यांनी कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातून एम.ए. (सर्वप्रथम) आणि पीएच.डी. पदवी संपादन केली. (पान ४ वर)

## भोंदू खरातचा विजय कोते यांच्याशी ६४ लाखांचा व्यवहार!

**विशेष प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** भोंदू बाबा कॅप्टन खरात याच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल झाल्यानंतर शिर्डीत खळबळ उडालेली असतानाच, आता या प्रकरणात आर्थिक व्यवहाराचे नवीन धागेदोरे समोर येत आहेत. शिर्डीचे प्रसिद्ध व्यापारी, बिल्डर तथा माजी उपनगराध्यक्ष विजय तुळशीराम कोते यांचे नाव या प्रकरणाशी जोडले गेल्याने त्यांनी स्वतः माध्यमांसमोर येत यावर मोठा खुलासा केला आहे.

विजय कोते यांनी स्पष्ट केले की, साधारण एक वर्षापूर्वी त्यांची खरातशी ओळख झाली होती. खरातला शिर्डी विमानतळाजवळील कोते यांचा प्लॉट पसंत पडल्याने त्यांच्यात जमिनीचा व्यवहार ठरला होता. खरात आणि कोते यांच्यात ५ एकर जमिनीचा सौदा होऊन त्याचे साठेखत करण्यात आले होते. या जमिनीचे ले-आउट देखील तयार झाले असून केवळ अंतिम मंजुरी बाकी होती. या व्यवहारापोटी कॅप्टन खरातने विजय कोते यांना आतापर्यंत ६४ लाख रुपये दिले आहेत. उर्वरित रक्कम देऊन तो हा व्यवहार पूर्ण करणार होता. एकीकडे खरातवर गंभीर गुन्हे दाखल होत असताना, दुसरीकडे त्याचे बड्या लोकांशी असलेले आर्थिक हितसंबंध समोर येत असल्याने शिर्डी परिसरात या प्रकरणाला आता राजकीय आणि व्यावसायिक वळण मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. खरातने हा पैसा कोठून आणला, याचीही चर्चा आता रंगू लागली आहे.

**■ जसे इतर लोक खरातला ओळखतात, तशीच माझीही ओळख होती. केवळ व्यावसायिक नात्यातून हा जमिनीचा व्यवहार झाला.**
**– विजय कोते**



## भोंदू खरात प्रकरण : पीडितेचा व्हिडिओ व्हायरल करणाऱ्या दोघांना बेड्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** भोंदू बाबा कॅप्टन खरात याच्या अघोरी कृत्यांनी जिल्हा हादरलेला असतानाच, आता या प्रकरणातील पीडित महिलांची बदनामी करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी कठोर कारवाई सुरू केली आहे. पीडित महिलेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केल्याप्रकरणी अहिल्यानगर पोलिसांनी कोपरगाव तालुक्यातून दोघांना अटक केली असून, एका आरोपीचा शोध अद्याप सुरू आहे. पोलीस तपासादरम्यान असे समोर आले की, एका व्हॉट्सॲप ग्रुपवर संबंधित पीडित महिलेचा व्हिडिओ जाणीवपूर्वक प्रसारित करण्यात आला होता. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी तातडीने सायबर शाखेच्या मदतीने तपास चक्रे फिरवली आणि दोषींना जेरबंद केले. या घटनेमुळे सोशल मीडियाचा गैरवापर करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. हे प्रकरण अत्यंत संवेदनशील असून यामध्ये अनेक महिला पीडित असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. पीडित महिलांची ओळख उघड करणे हा कायद्याने गुन्हा आहे. कोणत्याही नागरिकाने अशा प्रकारचे व्हिडिओ किंवा फोटो पुढे शेअर करू नयेत. जो कोणी अशा कृत्यात सहभागी आढळेल, त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा कडक इशारा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिला आहे.

## सोशल मीडियावरील आक्षेपार्ह वक्तव्य भोवले

### श्रीरामपुरात बेदम मारहाणीत तरुण गंभीर जखमी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** एका हिंदुत्ववादी नेत्याबाबत सोशल मीडियावर व्हिडीओ व्हायरल करून आक्षेपार्ह वक्तव्य केल्याच्या कारणावरून श्रीरामपूर शहरात बुधवारी रात्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात एका तरुणास हॉकीस्टिकने मारहाण करत गंभीर जखमी केले.

श्रीरामपूर शहरातील वॉर्ड न. २ मधील अज्जू पठाण याने एका हिंदुत्ववादी नेत्याबाबत सोशल मीडियावर व्हिडीओ व्हायरल करून आक्षेपार्ह वक्तव्य करून तुझ्यात एकट्यात दम असेल तर त्याला शिवाजी चौकात येण्याचे आव्हान केले होते. याकारणामुळे काही अज्ञात तरुणांनी हॉकीस्टिकने मारहाण केली. यात अज्जू पठाण हा जखमी झाला असून सुरूवातीला साखर कामगार रूग्णालय येथे आणि नंतर पुढील उपचारासाठी अज्जू पठाण याला लोणीला हलवण्यात आले.

तेथे त्याचेवर उपचार सुरू आहेत. याबाबत पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली (पान ४ वर)

### झेंडा मिरवणुकीवर दगडफेक



**झेंडा मिरवणुकीदरम्यान सय्यदबाबा दर्ग्यापुढे दगडफेकीत जखमी झालेला तरुण**

रामनवमी निमित्त काढण्यात आलेल्या श्रीराम झेंडा मिरवणुकीवर साय्यद बाबा चौक परिसरात अचानक दगडफेक झाल्याने तणाव निर्माण झाला. या घटनेत सुयोग झिरंगे, किरण लबडे व यश गोराणे जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे व अन्य अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी केली. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सीसीटीव्हीच्या आधारे आरोपींचा शोध सुरू आहे. दरम्यान, नागरिकांना शांतता राखण्याचे व अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# श्रीराम जन्मोत्सवाने यात्रोत्सवाला प्रारंभ!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** रामनवमीनिमित्त मंदिरावर आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे. त्याआधी ८ दिवस श्रीराम नवमीनिमित्त अखंड पारायण सोहळा आयोजित करण्यात आला होता काल्याच्या कीर्तनाने सांगता होवून काल २६ मार्च रोजी दुपारी बाराच्या मुर्हूताला श्रीराम मंदिरात रामजन्मोत्सवाचा सोहळा पार पडला. मंदिराचे गुरू वाडेकर यांनी रामजन्माचे सर्व सोपस्कार पार पाडले.

यावेळी आमदार हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे, प्रांताधिकारी किरण सावंत व पत्नी मनिषा, मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप, तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, पोलिस उपअधिक्षक जयदत्त भवर, पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, माजी नगराध्यक्ष संजय फंड, सचिन गुजर, सिध्दार्थ मुरकुटे, बाबासाहेब दिघे, दिपाली ससाणे, संजय छल्लारे, नगरसेवक आशिष धनवटे, दीपक चव्हाण, वैशाली चव्हाण, मंजुश्री मुरकुटे, संजय गांगड, सिद्धार्थ फंड, योगेश जाधव, जितेंद्र छाजेड, मनोज लबडे, दिलीप नागरे, आशा परदेशी, श्रीराम मंदिर ट्रस्टच्या प्रणिता गिरमे, मोहनभाई पटेल, दिनेश सूर्यवंशी, रौनक गिरमे, मुन्ना झंवर, सचिन महाले, प्रकाश चित्ते, दिपाली चित्ते, यात्रा कमिटीचे सत्यनारायण उपाध्ये, गौतम उपाध्ये, अशोक उपाध्ये, ज्ञानेश्वर मुरकुटे, नीरज मुरकुटे आदी उपस्थित होते.

भाविकांना पंजेरीचा प्रसाद वाटप करण्यात आला. सकाळी अभिषेक, आरती तसेच कीर्तनाचा कार्यक्रम पार पडला. भाविकांना राम जन्मसोहळा पाहता यावा यासाठी राम मंदिर चोकात एलईडी स्क्रीन लावण्यात आली होती.

तसेच फेसबुक लाईव्ह करण्यात आले होते. काल सकाळपासून श्रीराम नवमी निमित्त श्रीराम जन्मोत्सवाच्या वेळेस शहरातील विविध संघटना तसेच, महसूल विभाग, पोलीस प्रशासन यांच्यावतीने झेंडा मिरवणूक ढोल ताशा, डीजेच्या वादयाच्या गजरात काढण्यात आली.

शहरात यात्रेनिमित्त मुख्य रस्त्यावर व्यावसायिकांनी दुकाने थाटली आहेत. आजपासून तीन दिवस यात्रा चालणार आहे. आज शुक्रवार दिनांक २७ रोजी सकाळी १० वाजता शहरातील ज्येष्ठ नागरिकांचा राम मंदिरात विश्वस्तांच्या वतीने सत्कार करण्यात येईल. सायंकाळी सहा वाजता शनिमहाराज रथाची मिरवणूक काढण्यात येणार आहे. शनिवार दिनांक २८ रोजी दुपारी जुन्या तहसील कचेरीजवळ कुस्त्याचा हगामा आयोजित करण्यात आला आहे.





**श्रीरामपूर – येथील श्रीराम मंदिरात प्रभू श्रीराम जन्माचा सोहळा साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रभू श्रीराम जन्माच्या पाळण्याची दोरी ओढताना आम. हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे, सचिन गुजर, ज्ञानेश्वर मुरकुटे, बाबासाहेब दिघे, दिपली नागरे, दत्तात्रय सानप, प्रतिक बोरावके, रौनक गिरमे, सचिन गुरू आदी. दुसऱ्या छायाचित्रात प्रभु श्रीराम, सीता व लक्ष्मण यांच्या फुलांनी सजविलेल्या मूर्ती. (छाया–संजय पगारे)**

## तहसीलदार ज्योती देवरेंसह १५ महसूल अधिकारी सक्तीच्या रजेवर

### कायदा मोडून सातबारात बदल केल्याने कारवाई





**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** महसूल अभिलेखांमध्ये कलम १५५ चा गैरवापर करून सातबारावर जमिनीचा वर्ग, क्षेत्रफळ आणि मालकीत फेरफार केल्याच्या आरोपांवरून राज्य शासनाने मोठी प्रशासकीय कारवाई करत १५ महसूल अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवले आहे. या कारवाईत पुण्यातील तत्कालीन तहसीलदार श्रीकांत पाटील, रवींद्र सबनीस, ज्योती देवरे आणि गीता गायकवाड यांच्यासह इतर अधिकाऱ्यांचा समावेश असल्याने महसूल विभागात खळबळ उडाली आहे.

या प्रकरणात एकूण १५२ अधिकाऱ्यांवर ठपका ठेवण्यात आला होता. त्यापैकी १५ जणांवर प्रथम टप्प्यात कठोर कारवाई करण्यात आली असून उर्वरित 'ब' व 'क' वर्गवारीतील १३७ अधिकाऱ्यांवर पुढे काय कारवाई होणार, याकडे नागरिकांसह प्रशासनाचेही लक्ष लागले आहे. नाशिक विभागीय आयुक्तांच्या समितीने तपासलेल्या २,३३७ प्रकरणांपैकी १३ प्रकरणे 'अ' वर्गवारीतील अतिगंभीर असल्याचे अधोरेखित केले आहे. या निष्कर्षानंतर राज्य शासनाने या प्रकरणाकडे गंभीरतेने पाहत कारवाईची प्रक्रिया गतीमान केली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यापूर्वीच दोषी अधिकाऱ्यांची (पान ४ वर)

## साखर कारखान्यांकडे ६५० कोटींची एफआरपी थकीत!

### शेतकरी संकटात : कारखान्यांवर कारवाई करण्याची संघटनांची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

अहिल्यानगर : महाराष्ट्रात साखर कारखान्यांनी २०२५-२६ च्या चालू हंगामातील सुमारे ६५० कोटी रुपयांची एफ.आर.पी. अद्याप थकीत ठेवली आहे. याच मुद्यावरुन ऊस उत्पादक शेतकरी कमालीचे आक्रमक झाले आहेत. मार्च अखेर पीक कर्जाच्या परतफेडीची मुदत जवळ आली असताना, हातात पैसे नसल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. याप्रकरणी सरकारने हस्तक्षेपणकरून शेतकऱ्यांना व्याजासह थकबाकी मिळेल यासाठी कारवाई करावी, अशी मागणी किसान सभा व ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती करत आहे.

पश्चिम महाराष्ट्रसह मराठवाड्यात उस उत्पादक शेतकरी उसाच्या उत्पादनात अग्रेसर आहेत. मात्र, यंदा कारखान्यांनी वेळेत बिले न दिल्याने शेतीचे गणित कोलमडले आहे. मार्च महिना संपायला अवघे काही दिवस शिल्लक असताना शेतकऱ्यांचे ६५० कोटी रु. कारखानदारांनी थकवले आहेत. उसाचे गाळप झाल्यानंतर १४ दिवसांच्या आत एफ.आर.पी.चे पैसे मिळणे बंधनकारक आहे. मात्र, अनेक कारखान्यांनी या नियमाचे उल्लंघन केले आहे. थकबाकीदार कारखान्यांवर साखर आयुक्तांनी तातडीने 'आर.आर.सी.' अंतर्गत कारवाई करून साखर साठा जप्त करावा आणि शेतकऱ्यांचे पैसे वसूल करावेत, किंवा शेतकऱ्यांच्या थकीत ऊस बिलाची जबाबदारी सरकारने घेऊन याबाबत साखर निर्यात, निर्यात अनुदान, इत्यादी उपाय करून शेतकऱ्यांना उसाचे पैसे मिळतील यासाठी योग्य हस्तक्षेप करावा, अशी मागणी आम्ही करत आहोत.

केवळ चालू हंगामातीलच नव्हे, तर मागील २०२४-२५ या हंगामातील एफ.आर.पी.ची रक्कमही व्याजासह मिळावी, अशी आग्रही मागणी किसान सभा व ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती करत आहे. येत्या काही दिवसांत थकबाकी न मिळाल्यास कारखान्यांच्या दारात आणि साखर आयुक्त कार्यालयावर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देत आहे. कोल्हापूर विभागातील काही कारखान्यांनी हंगाम २०२३-२४ मधील ऊस दर देताना २९५० रुपये प्रति टन दिला आहे. परंतु यावर्षी दिघंची गटातील तालुका आटपाडी येथील जवळपास (पान ४ वर)

**थकबाकीची प्रमुख कारणे:**

- **साखर साठा : साखरेचे किमान विक्री मूल्य न वाढल्याने कारखान्यांकडे खेळते भांडवल कमी असणे.**
- **इथेनॉल धोरण: इथेनॉल निर्मितीवरील मर्यादांमुळे मिळणाऱ्या उत्पन्नात झालेली घट.**
- **व्याजाचा बोजा: जुनी कर्जे आणि बँकांचे वाढलेले व्याज यामुळे कारखान्यांची आर्थिक ओढाताण.**

**अहिल्यानगर जिल्ह्यात २०० कोटींची थकबाकी**

**नुकत्याच पार पडलेल्या गाळप हंगामात अहिल्यानगर जिल्ह्यातील कारखान्यांनी मिळून गाळप केलेल्या उसापोटी सुमारे ४५०० कोटी रुपये एफआरपी देय होती. त्यापैकी सुमारे ९२% ते ९४% रक्कम अदा करण्यात आली असून जिल्ह्यातील सर्व कारखान्यांची मिळून साधारण १५० ते २०० कोटी रुपये थकबाकी अद्याप कागदोपत्री शिल्लक आहे.**

# संपादकीय

## मर्यादांचे उल्लंघन आणि लोकशाहीचे संतुलन

भारतीय लोकशाहीचा डोलारा कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायपालिका या तीन प्रमुख स्तंभांवर उभा आहे. या तिन्ही शाखांनी आपापल्या परिघात राहून कार्य करावे, अशी राज्यघटनेची अपेक्षा आहे. मात्र, गेल्या काही काळातील घडामोडी पाहता, 'आपणच सर्वोच्च' आहोत या भावनेतून या संस्था परस्परांच्या अधिकारांवर आक्रमण करत असल्याचे चित्र दिसत आहे. विधिमंडळाच्या अलिकडच्या अधिवेशनात पीठासीन अधिकार्यांनी सनदी अधिकार्यांच्या निलंबनाचे दिलेले निर्देश आणि त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेली 'कानउघाडणी' या पार्श्वभूमीवर, सत्तेच्या पृथक्करणाचा सिद्धांत पुन्हा एकदा चर्चेच्या ऐरणीवर आला आहे.

**अधिकार कक्षेची पुसट होत चाललेली रेषा**

राज्यघटनेनुसार, धोरण ठरवणे आणि त्याची अंमलबजावणी करणे हे कार्यकारी मंडळाचे काम आहे, तर कायदे करणे आणि सरकारच्या कामावर देखरेख ठेवणे हे कायदे मंडळाचे कर्तव्य आहे. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश मार्कंडेय काटजू यांनी म्हटल्याप्रमाणे, 'सरकार चालवणे हे न्यायालयाचे काम नाही.' हाच न्याय विधिमंडळाच्या पीठासीन अधिकार्यांनाही लागू होतो. विधानसभा अध्यक्ष किंवा विधान परिषद सभापती हे सभागृहाचे संरक्षक असतात, प्रशासनाचे प्रमुख नव्हे.

प्रशासकीय अधिकार्यांवर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचे किंवा त्यांना निलंबित करण्याचे अधिकार सर्वस्वी संबंधित खात्याच्या मंत्र्यांकडे आणि मुख्यमंत्र्यांकडे असतात. जेव्हा पीठासीन अधिकारी भर सभागृहात एखाद्या आयएएस किंवा आयपीएस अधिकार्याला निलंबित करण्याचे 'निर्देश' देतात, तेव्हा ते आपल्या घटनात्मक मर्यादेचे उल्लंघन करत असतात.

**'आदेश' आणि 'निर्देश' यातील गल्लत**

अधिवेशनादरम्यान पीठासीन अधिकार्यांनी दिलेले निर्देश हे सरकारसाठी 'सल्ला' किंवा 'सुधारणात्मक सूचना' असतात. ते सरकारवर बंधनकारक नसतात. मात्र, अलीकडे निर्देशांना 'आदेशाचे' स्वरूप देण्याचा प्रयत्न होताना दिसतो. एका बाजूला नीलम गोर्हे यांनी सातार्यातील वादावरून पोलिसांच्या निलंबनाचे निर्देश दिले, तर दुसरीकडे विधानसभा अध्यक्षांच्या काही कृती वादाच्या भोवर्यात अडकल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ''पीठासीन अधिकार्यांचे निर्देश म्हणजे ब्रह्मवाक्य नव्हे,'' असे ठणकावून सांगणे ही एका अर्थी घटनात्मक चौकटीची आठवण करून देणारी कृती होती. जर पीठासीन अधिकारीच थेट निलंबनाचे आदेश देऊ लागले, तर प्रशासकीय व्यवस्थेत अराजकता निर्माण होईल. नोकरशाहीला कोणाचे ऐकायचेसभागृहाचे की सरकारचेअसा संभ्रम निर्माण होणे लोकशाहीसाठी घातक आहे.

**राजकीय सोयीचे राजकारण आणि विरोधाभास**

मात्र, या वादात एक दुसरी बाजूही आहे. मुख्यमंत्र्यांनी पीठासीन अधिकार्यांना त्यांच्या मर्यादांची जाणीव करून दिली असली, तरी स्वतः सरकारने मात्र राजकीय सोयीनुसार या निर्देशांचा वापर केला आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव डॉ. देवेंदर सिंह यांच्या बाबतीत अवघ्या २४ तासांत निलंबनाचे आदेश निघाले, कारण ते मंत्र्यांना माहिती देण्यासाठी उपस्थित नव्हते. मात्र, जेव्हा सत्ताधारी गटाच्या विरोधात किंवा हिताच्या आड येणार्या अधिकार्याचा प्रश्न येतो, तेव्हा निकष बदलतात का? असा प्रश्न उपस्थित होतो. सातारा जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपला मदत केल्याचा आरोप असलेल्या पोलीस अधीक्षकांचे प्रकरण असो किंवा अन्य, जेव्हा राजकीय हितसंबंध जपले जातात, तेव्हा 'घटनात्मक मर्यादा' बाजूला सारल्या जातात का, हा कळीचा मुद्दा आहे.

**वैभवशाली परंपरेचे रक्षण आवश्यक**

महाराष्ट्र विधिमंडळाला अत्यंत वैभवशाली आणि वैचारिक वारसा लाभला आहे. वि. स. पागे, बाळशास्त्री भारदे यांसारख्या दिग्गज महोदयांनी पीठासीन पदाची प्रतिष्ठा वाढवली. आजच्या काळात हे पद राजकीय वादाचे केंद्र बनणे दुर्दैवी आहे. विधानसभा अध्यक्षांनी निष्पक्षपातीपणे वागणे अपेक्षित असताना, त्यांच्यावर राजकीय पक्षपाताचे किंवा दबावाचे आरोप होणे हे पदाच्या प्रतिष्ठेला साजेसे नाही.

न्यायपालिका जशी कार्यकारी मंडळाच्या कामात विनाकारण हस्तक्षेप करू शकत नाही, तसेच कायदे मंडळानेही प्रशासकीय कामात थेट ढवळाढवळ करणे टाळले पाहिजे. अधिकार्यांची चूक असेल तर त्यांच्यावर चौकशीअंती कारवाई करण्याचे अधिकार सरकारला आहेतच, पण पीठासीन अधिकार्यांनी आपल्या अधिकाराचा वापर राजकीय हत्यार म्हणून करू नये.

**स्वतःला 'सुपर एक्झिक्युटिव्ह' समजणे थांबवावे**

लोकशाहीचे यश हे या तिन्ही यंत्रणांच्या समन्वयात आणि परस्परांच्या आदरात दडलेले आहे. मुख्यमंत्र्यांनी घेतलेली भूमिका ही तात्विकदृष्ट्या योग्य असली, तरी ती केवळ सोयीपुरती नसावी. सर्वच यंत्रणांनी 'संविधानाचे पावित्र्य' आणि 'मर्यादांचे पालन' केले तरच जनतेचा या संस्थांवरील विश्वास टिकून राहील. पीठासीन अधिकार्यांनी स्वतःला 'सुपर एक्झिक्युटिव्ह' समजणे थांबवावे आणि सरकारनेही प्रशासकीय उत्तरदायित्व जपताना दुटप्पी भूमिका टाळावी, हीच अपेक्षा..!

# संगमनेरमध्ये रामजन्मोत्सव विविध कार्यक्रमांनी साजरा आ. अमोल खताळ व नीलम खताळ यांच्या हस्ते महाआरती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** संगमनेर शहर आणि तालुक्यातील विविध राममंदिरात प्रभू श्रीरामचंद्र यांचा जन्मोत्सव विविध धार्मिक कार्यक्रमांनी भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी आमदार अमोल खताळ पत्नी नीलम खताळ, उद्योजक राजेश मालपाणी, पोलीस निरीक्षक समीर बारवकर, योगराज परदेशी आदी राम भक्तांच्या हस्ते प्रभू रामचंद्रांची महाआरती करण्यात आली. शहरातील चंद्रशेखर चौकातील राममंदिरामध्ये श्रीराम जयंती उत्सव समितीच्या वतीने मंदिरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. दुपारी महिला रामभक्तांनी एकत्र येत पारंपरिक पद्धतीने रामजन्माचा पाळणा गात, प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव साजरा केला. या वेळी राम भक्तांनी ''जय श्रीराम''च्या घोषणांनी



मंदिर परिसर दणाणून गेला. राम जन्मोत्सव समितीच्या वतीने आमदार खताळ, पत्नी नीलम खताळ, उद्योजक राजेश मालपाणी, पोलीस निरीक्षक समीर बारवकर, ऋषिकेश मोंढे, राम मंदिर ट्रस्ट विश्वस्त उपासनी बंधू, विजय नागरीचे उपाध्यक्ष विशाल जाखडी, श्रीराम नवमी व हनुमान जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सोमनाथ पराई, उपाध्यक्ष कमलाकर भालेकर, विनय गुणे, गिरीश देशपांडे, श्रीराम गणपुले, वरद बागुल, मुन्ना जोशी, योगेश मंगलकर, राम वामन, विनायक तांबे, विलास परदेशी, योगराज परदेशी, अक्षय थोरात आणि ऋषिकेश मुळे यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी शहरातील प्रभू रामचंद्र यांचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने रामभक्तांनी गर्दी केली होती.रामजन्मोत्सव समितीच्या वतीने दर्शनासाठी आलेल्या सर्व भक्तांसाठी थंडगार मठ्ठ्याची व्यवस्था करण्यात आली होती. संगमनेर शहरातील चंद्रशेखर चौक, पंजाबी कॉलनी तसेच नवीन नगर रोडवरील अभिनव नगर येथील राममंदिरांमध्ये उत्सवाची जय्यत तयारी सुरू होती. आकर्षक फुलांनी मंदिरांची सजावट करण्यात आली होती तसेच सर्व राम मंदिरे रोषणाईने उजळून निघाले.

> संगमनेर तालुक्यात गेली अनेक वर्षे रावनराज्य होते. मात्र ते जाऊन आता या तालुक्यात खऱ्या अर्थाने रामराज्य आले आहे. त्यामुळे सर्व महापुरुषांचे जन्मोत्सव सोहळे धुमधडाक्यामध्ये साजरे होत आहेत. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी रामजन्मोत्सव सोहळा शहरातील सर्व श्रीराम मंदिरात धुमधडाक्यात साजरा होत आहे. याचा मनस्वी आनंद आहे.
>
> **अमोल खताळ**
> **आमदार**

# पोलीस ठाण्यांत अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष स्थापन करण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पोहेगाव :** राज्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यात जादूटोणाविरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष तातडीने स्थापन करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. अशोक गावित्रे यांनी केली आहे.

पोलीस महासंचालक कार्यालयाने १९ जुलै २०२४ रोजी यासंदर्भात आदेश दिले असतानाही अनेक ठाण्यांत हा कक्ष अद्याप स्थापन झालेला नाही, असे त्यांनी निवेदनात नमूद केले. याबाबत पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती तसेच स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांकडे त्यांनी निवेदन सादर केले.

या कक्षामध्ये पत्रकार,



महिला प्रतिनिधी व अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील कार्यकर्त्यांचा समावेश करून नियमित आढावा बैठका घेण्याची मागणीही करण्यात आली आहे. यामुळे परिसरातील अघोरी प्रकारांना वेळीच आळा घालता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

भोंदू बाबा व ज्योतिषांच्या माध्यमातून होणारे शोषण रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक असल्याचेही गावित्रे यांनी नमूद केले.

# भगवान श्रीराम हे धर्म, सत्य, कर्तव्य, आणि न्यायचे प्रतीक : माजी मंत्री गडाख

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** हिंदू धर्मातील रामनवमी हा ठिकठिकाणी महत्त्वाचा उत्सव साजरा केला जातो, या दिवशी रामायणाचे पठण, भजन, कीर्तन, प्रवचन, आयोजित केले जातात असाच हा'' ५१ फुटी'' धर्म ध्वजाचे लोकार्पण करण्याचा आनंद झाला, खऱ्या अर्थाने हे हिंदू धर्माचे प्रतीक असल्याचे मत राज्याचे माजी मंत्री शंकररावजी गडाख यांनी व्यक्त केले. ते लांडेवाडी- श्रीरामवाडी रस्त्यावर श्रीराम चौकात श्रीराम नवमीचे अवचित साधून ५१ फुटी धर्म ध्वजाचे लोकार्पण सोहळ्यात मत व्यक्त केले. याप्रसंगी जय जय श्रीराम जय जय श्रीराम च्या घोषणा देण्यात आल्या सर्व रामभक्तांनी भगव्या टोप्यां परिधान केल्या होत्या.

याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य सुनील गडाख,ह भ प पंढरीनाथ महाराज तांदळे, माजी जिल्हा परिषद सदस्य अशोक साळवे, पंचायत समितीचे माजी सदस्य घोडेगावचे बाळासाहेब सोनवणे, गणेशवाडीचे सरपंच कैलास दरंदले, सोनई सोसायटीचे माजी अध्यक्ष आप्पासाहेब निमसे, सुभाष राख,यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.



# येडूआईच्या मानाच्या काठीची आज मिरवणूक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव :** राहता तालुक्यातील हनुमंतगाव येथून श्री क्षेत्र पिंपळदरीच्या दिशेने निघणाऱ्या येडूआईच्या मानाच्या काठीची आज (दि. २७ मार्च) हनुमंतगाव ते धानोरे या मार्गावर भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. भिल्ल समाजाच्या श्रद्धेचे केंद्र असलेल्या या काठीला यात्रेत विशेष मानाचे स्थान असून, यंदाही मोठ्या उत्साहात हा सोहळा पार पडणार आहे.

श्री क्षेत्र पिंपळदरी येथील येडूमातेची यात्रा दि. ३ एप्रिल रोजी भक्तीमय वातावरणात साजरी होणार असून राज्यभरातून लाखो भाविक या यात्रेसाठी उपस्थित राहतात. या यात्रेत हनुमंतगाव येथील मानाची काठी ही प्रमुख



आकर्षण ठरते. अनेक वर्षांची परंपरा जपत या काठीला मंदिरात स्थान देऊन विधिवत पूजा केली जाते, त्यामुळे या काठीचे धार्मिक महत्त्व अधिकच वृद्धिंगत झाले आहे.

हनुमंतगावातील चारी नंबर एक येथून दरवर्षी मानाची काठी पिंपळदरीकडे प्रस्थान करते. उद्या सकाळी हनुमंतगावातून निघणारी ही मिरवणूक धानोरे गावापर्यंत जल्लोषात काढली जाईल. संध्याकाळी धानोरे घाट येथे काठीचा मुक्काम राहणार असून, दुसऱ्या दिवशी सकाळी काठी पिंपळदरीकडे रवाना होईल. या मिरवणुकीत एकलव्य भिल्ल सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ज्ञानेश्वर अहिरे, ॲड. किसन कोतकर, कारखान्याचे संचालक अशोक घोलप, संजय अनाप, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

# शरीर-मन शुद्धीसाठी योग-प्राणायाम आवश्यक : पांडुरंग अभंग

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कुकाणा :** निरोगी व आनंदी जीवनासाठी योग व प्राणायाम अत्यावश्यक असून त्यातून शरीर व मनाचे शुद्धीकरण होते, असे प्रतिपादन माजी आमदार पांडुरंग अभंग यांनी केले. कुकाणा येथे पतंजली योग समितीच्या वतीने श्रीराम नवमी निमित्त आयोजित आयुर्वेदिक कांस्य थाळी फूट मसाज थेरपीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व पूजनाने झाली. यावेळी एकनाथराव कावरे, दौलतराव देशमुख, भाऊसाहेब फोलाणे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. अभंग म्हणाले की, अयोग्य जीवनशैलीमुळे अनेकजण आजारांनी ग्रस्त आहेत. नियमित आहार, व्यायाम, योग व प्राणायामामुळे आरोग्य सुधारते. समितीने सुरू केलेली नि:शुल्क थेरपी सेवा कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी योगगुरू दिगंबर रिंधे, नामदेव उंडे यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच एनएमएमएस शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास ग्रामस्थ व योगसाधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वेळेचे महत्त्व ओळखा; यशाचा मार्ग सुकर : प्रविणऋषी महाराज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** मानव जन्म दुर्मिळ असून जीवन व वेळेचे महत्त्व ओळखणारेच खऱ्या अर्थाने यशस्वी होतात, असे प्रतिपादन जैनमुनी प्रविणऋषी महाराज यांनी केले. येथील शिवाजी रोड स्थानक परिसरात आयोजित महावीर गाथा कार्यक्रमात ते बोलत होते. हा कार्यक्रम ३१ मार्चपर्यंत दररोज रात्री ८ ते १० या वेळेत नवीन मराठी शाळेत सुरू असून भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावीर गाथा समितीने केले आहे.प्रविणऋषी महाराज म्हणाले की, महावीर कथेचा अभ्यास केल्याने विचारांमध्ये सकारात्मक बदल होतो. चांगली संगत व मूल्याधिष्ठित जीवनशैलीमुळे जीवनात आनंद निर्माण होतो. प्रत्येक श्वासाची किंमत ओळखली तरच जीवनाचा खरा अर्थ समजतो. जिजामातांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर केलेल्या संस्कारांचे उदाहरण देत त्यांनी पालकांच्या मार्गदर्शनाचे महत्त्व अधोरेखित केले. माता-पित्यांचा आदर, सत्याचा मार्ग आणि शांततेचे आचरण हेच प्रगतीचे खरे सूत्र असल्याचे त्यांनी सांगितले.

# पानेगावात ज्ञानदान केलेल्या अनिल मोरे यांचा सत्कार; गावकऱ्यांचा अभिमान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पानेगाव :** येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत २००४ ते २००९ या काळात शिक्षक म्हणून उल्लेखनीय कार्य केलेले अनिल मोरे यांची सोनई पोलीस ठाण्याच्या प्रभारी सहायक पोलीस निरीक्षकपदी नियुक्ती झाल्याने गावकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. यानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला.

मुळा कारखान्याचे ज्येष्ठ संचालक व माजी सरपंच संजय जंगले यांनी मोरे यांच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, शिक्षक म्हणून कार्यरत असताना त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण केली. गरीब विद्यार्थ्यांना



स्वतःच्या खर्चाने वह्या-पुस्तके देऊन त्यांनी शाळेला कुटुंब मानले. त्यांच्या प्रयत्नांमुळे शाळेचा नावलौकिक वाढला.

पोलीस सेवेतही ते याच समर्पणाने काम करतील व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करतील, असा विश्वास जंगले यांनी व्यक्त केला.

यावेळी उपसरपंच सुरेश जंगले, संदिप जंगले, बाळासाहेब पाटील, संजय पवार, विलास बर्डे, पोपटराव जंगले आदी उपस्थित होते. प्रतिक्रिया देताना अनिल मोरे यांनी, शिक्षक म्हणून कार्य केलेल्या ठिकाणीच पोलीस अधिकारी म्हणून सेवा करण्याची संधी मिळणे भाग्याची बाब असून सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी कटिबद्ध राहीन, असे सांगितले.

# संत गाडगेबाबा उद्यानाची दुरुस्ती देखभाल अभावी दुरावस्था

**शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** जुने तहसील कार्यालय आणि पंचायत समिती समोरील उद्यानाची देखभाल दुरुस्तीअभावी मोठी दुरवस्था झाली आहे. तुटलेल्या खेळण्यांमुळे लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. तुटलेल्या खेळाचे साहित्य आणि दुरुस्ती देखभालीचा अभाव यामुळे ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना उद्यानाचा वापर करणे कठीण झाले आहे. यावर उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

जुन्या तहसील कार्यालयाच्या शेजारी पालिकेचे संत गाडगेबाबा उद्यान आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी तसेच लहान मुलांना खेळण्यासाठी हे उद्यान तयार करण्यात आले आहे. उद्यानात येणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी बसण्यासाठी बाकडे, लहान मुलांसाठी घसरगुंडी, झोपाळे, सीसॉ असे खेळण्याचे साहित्य बसविण्यात आले आहे. संपूर्ण वार्ड नंबर दोन, सुभेदार वस्ती फातिमा हाऊसिंग सोसायटी, मील्लत नगर, संजय नगर, जिरंगे मळा संतुलुक हॉस्पिटल परिसर या भागातील रहिवासी या उद्यानात सकाळ संध्याकाळ येत असतात.



शहरात इतर काही कामानिमित्त येणारे नागरिक यांच्यासाठीही हे उद्यान अत्यंत सोयीचे ठरत होते. पण, गेल्या काही काळात उद्यानाची योग्य निगा राखली गेली नसल्यामुळे दुरावस्था झाली आहे. उद्यानांमध्ये लहान मुलांसाठी बसवण्यात आलेली घसरगुंडी, झोपाळे आणि इतर खेळणी तुटलेल्या अवस्थेत आहेत. लोखंडी साहित्याला गंज चढला असून धारदार कडा बाहेर आला असल्यामुळे लहान मुलांना खेळताना दुखापत होण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

उद्यानातील साहित्य मोडकळीस आल्यामुळे नागरिकांचा उद्यानातील वावर गेल्या काही काळात कमी झाला आहे. उद्यानातील कारंजा सध्या बंद आहे. त्यामुळे लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक हिरमुसले आहेत. रात्रीच्या वेळी पुरेसा प्रकाश नसल्याने महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना या ठिकाणी फिरणे कठीण झाले असल्याचे स्थानिक रहिवाशी सांगतात. उद्यानाची झालेली दुरवस्था पाहता पालिका प्रशासनाने या उद्यानांची तातडीने डागडुजी करावी, तुटलेली खेळणी दुरुस्त करावीत आणि सुरक्षारक्षकाची नेमणूक करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.तत्कालीन आमदार स्वर्गीय जयंत ससाणे आणि काँग्रेसच्या पक्षप्रतोत माजी नगराध्यक्ष राजश्री ससाणे यांच्या दूरदृष्टी मुळे या भागात हे उद्यान उभारण्यात आले होते. अभिनेता सुनील शेट्टी यांच्या हस्ते या उद्यानाचा शुभारंभ करण्यात आला होता. लहान मुले ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसाठी हे उद्यान अतिशय सुंदर असे असून फक्त असलेल्या खेळण्याची तातडीने दुरुस्ती होणे गरजेचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# श्रीराम साधना आश्रमात प्रभू श्री रामचंद्रांचा जन्मोत्सव साजरा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील मुकिंदपूर येथील श्रीराम साधना आश्रमामध्ये रामनवमी निमित्त महंत स्वामी सुनीलगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व संत महंतांसह हजारो भाविकांच्या उपस्थितीत पुष्पवृष्टी करून प्रभू श्री रामचंद्रांचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

प्रभू श्री रामचंद्र भगवंताच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने महंत परमहंस मुक्तानंद महाराज वेल्हाळे संगमनेर यांचे किर्तन झाले. ते म्हणाले की जीवनात संतांची संगतीने केलेला परमार्थ फलद्रुप होत असतो तो परमार्थ आपणास प्राप्त व्हावा म्हणून महंत सुनीलगिरी बाबांनी श्रीराम साधना आश्रमाची येथे स्थापना करून आपल्या सर्वांना भक्ती मार्गाला लावले.

श्रीराम जन्मोत्सव प्रसंगी श्रीराम साधना आश्रमाचे महंत स्वामी सुनीलगिरी महाराज, महंत परमहंस मुक्तानंद महाराज वेल्हाळे, भागवताचार्य साध्वी सुवर्णानंदगिरी महाराज चैतन्य, साहेबराव महाराज चावरे, संतसेवक वैभव निकम, आणि इतर यांच्या हस्ते सामूहिक आरती करण्यात आली.

पाळण्याची दोरी ओढून प्रभू रामचंद्रांचा जन्मोत्सव पुष्पवृष्टी करून साजरा करण्यात आला. यावेळी ''सियावर रामचंद्र की जय''जय श्रीराम''असा जयघोष यावेळी करण्यात आला.यावेळी उपस्थित भाविकांना शाबुदाना खिचडीचे वाटप प्रसादाच्या रूपाने करण्यात आले.रामनवमी निमित्ताने श्रीराम मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. मंदिर परिसरात केलेली भव्य रोषणाई भाविकांचे आकर्षण ठरली,

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## बाभळेश्वरच्या कृषी विज्ञान केंद्राच्या प्रियंका खर्डे यांना पी.एचडी



**प्रवरानगर** : पायरेन्स संस्थेच्या कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वर या ठिकाणी कार्यरत असलेल्या विस्तार विभागाच्या प्रमुख डॉ. प्रियंका बाळकृष्ण खर्डे यांना महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या वतीने फार्मर प्रोड्युसर कंपन्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये परिवर्तन या विषयावरती सादर केलेल्या शोध निबंधास पी.एचडी प्रदान करण्यात आली . त्यांना महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे विस्तार संचालक डॉ. गोरक्षनाथ ससाणे यांचे मार्गदर्शन लाभले. कोल्हार भगवतीपुर या ठिकाणी शेतकरी कुटुंबात कार्यरत असणाऱ्या डॉ. प्रियंका खर्डे यांनी शेती क्षेत्रात नाविन्यपूर्ण प्रयोग करत असताना विस्तार क्षेत्रामध्ये कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर च्या माध्यमातून शेतकरी , महिला युवकांसाठी विविध अंगी काम त्या करत आहेत.

## कुलस्वामिनी तुळजाभवानी चरणी तेली समाज बांधवाकडून १३ तेल डबे अर्पण



**सोनई** : कुलस्वामिनी तुळजा भवानी माता मंदिर चैत्र नवरात्र उत्सव २०२६ यानिमित्ताने २७ मार्च २०२६ या दिवशी हरी कीर्तन सप्ताह समाप्ती महाप्रसादासाठी सोनई गावातील सर्व तेली समाजाने वतीने महाप्रसादाच्या अन्नदानासाठी १३ तेल डबे तुळजाभवानी देवी मंदिराच्या चरणी अर्पण केले. मंदिर कार्यकारणी सदस्य मंडळ श्री आबासाहेब दरंदले व बाबुराव घावटे यांच्या उपस्थितीमध्ये संत संताजी महाराज युवक मंडळाचे अध्यक्ष कृष्णा सुद्रिक, गणेश देशमाने ,सेवानिवृत्त वाहतूक नियंत्रक अशोक क्षीरसागर,व्यावसायिक चंद्रकांत जगताप यावेळी उपस्थित होते. अनेक दानशूर भक्तांनी रोख स्वरूपात व शिधा स्वरूपात गुप्त अन्नदानसदठी मदत करण्यात आली आहे. या कीर्तन सोहळा व चैत्र नवरात्री निमित्ताने भाविक दर्शनासाठी व कार्यक्रमासाठी मोठी गर्दी करत आहे. या प्रसंगी हभप भास्करगिरी महाराज यांनी देवीचं दर्शन घेऊन देवस्थान विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष गोरखशांनाथ दरंदले,आबासाहेब दरंदले, बाबुराव घावटे,डॉ. माऊली दरंदले, रघुनाथ गव्हाणे,यांनी महाराज यांचे स्वागत केले.

## पाचुंदा येथील पीर बाबाचा यात्रा उत्सवाची सांगता



**नेवासा फाटा** : नेवासा तालुक्यातील पाचंदा येथील पीर बाबाच्या यात्रा उत्सवाची कुस्त्याच्या जंगी हागाम्यानी सांगता करण्यात आली. पांचुदा येथील सर्व धर्मीयांच ग्रामदैवत पीर बाबांच्या यात्रा उत्सव गेल्या अनेक दिवसापासून दरवर्षी आयोजन केल जात. याही वर्षी यात्रा निमित्ताने विविध धार्मिक तसेच मनोरंजनाच्या कार्यक्रमासह जंगी कुस्त्याच्या हगाम्याच आयोजन करण्यात आलं होतं यात कावड मिरवणूक, छबिना हजेरीचा कार्यक्रम यासारखे कार्यक्रम ठेवण्यात आले होते. या यात्रा उत्सवाच्या निमित्ताने गावातील तसेच परिसरातील हजारो भाविक बाबांच्या समाधीच्या दर्शनासाठी आले होते यावेळी खेळणी तसेच संसार उपयुक्त साहित्य खरेदीसाठी दुकानांमध्ये महिलांनी मोठी गर्दी केली होती. हा यात्रा उत्सव यशस्वीरित पार पाडण्यासाठी यात्रा कमिटीचे उमेश हंडाळ ,पोपट वाघमोडे,भरत होंडे ,मोहन चोपडे, अविनाश वाघमोडे, दादा भिसे ,बुवाजी माने ,नवनाथ माने , सदाशिव कोकरे, चंद्रकांत खरात ,आबासाहेब होडगर, बाबासाहेब शिंदे, मनोहर कोकरे, साहेबराव होंडे आदींनी परिश्रम घेतले.

## रामनवमी महोत्सव निमित्त झेंडा मिरवणूक

**नेवासा** : येथे श्री रामनवमी महोत्सव समितीच्या श्रीराम मंदिरावर लावण्यासाठी झेंडा मिरवणूक व प्रतिमा मिरवणूक काढण्यात आली. रामभक्त शिवा राजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या मिरवणूक प्रसंगी शालेय विद्यार्थीनींचे झेंडापथक व लेझीम पथक व रिंगण सर्व श्रीराम भक्तांचे आकर्षण ठरले होते. श्रीरामनवमीच्या निमित्ताने काढण्यात आलेल्या या झेंडा व प्रतिमा मिरवणूकीस नेवासा एस टी स्टँड कॉर्नर पासून सकाळी १० वाजता सुरुवात करण्यात आली यावेळी विविध पक्ष संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने प्रभू श्रीरामचंद्राच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. आलेल्या सर्वपक्षीय पदाधिकारी व इतर संघटनेच्या सदस्यांचे मिरवणूक सोहळा संयोजक शिवा राजगिरे यांनी स्वागत केले. सौदामिनी ग्रुपच्या वतीने लेझीम पथक व झेंडा पथकाचे सादरीकरण करण्यात आले. सदरची मिरवणूक एस टी चौक, श्री खोलेश्वर गणपती चौक, नगरपंचायत चौक, डॉ. हेडगेवार चौक मार्गे शिस्तबद्ध पद्धतीने काढण्यात आली. यावेळी पो. नि. महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चौकाचौकात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मिरवणुकीचे प्रमुख संयोजक शिवा राजगिरे यांनी उपस्थित रामभक्तांचे व पोलीस प्रशासनाचे आभार मानले.

# जोर्वेला अल्पवयीन मुलीशी तरुणाचे गैरवर्तन, ॲसिड हल्ल्याची धमकी

## कोयता व हातोडीने मारहाण करून जखमी तिघांविरुद्ध गुन्हा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्यातील जोर्वे येथे बारावीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या एका अल्पवयीन मुलीशी गावातीलच सार्थक राजेंद्र बलसाने या तरुणाने गैरवर्तन केले आणि हा प्रकार तुझ्या आई-वडिलांना सांगितला तर तुझ्या वर वडगाव पानप्रमाणे ॲसिड हल्ला करण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पीडित मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून संगमनेर तालुका पोलिसांनी सार्थक राजेंद्र बलसाने, त्याची आई आश्विनी राजेंद्र बलसाने व भाऊ भविष्य राजेंद्र बलसाने (सर्व रा. जोर्वे ता संगमनेर) यांच्याविरोधात गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. संगमनेर तालुक्यातील जोर्वे येथील सार्थक राजेंद्र बलसाने या तरुणाने आपल्या घराजवळच राहत असणार्या एका अल्पवयीन मुलीसमोर गैरवर्तन केले.हा सर्व प्रकार माझ्या आईला सांगेल असे म्हणाली त्यावर तू माझे नाव तुझ्याआईला सांगितले तर वडगाव पान येथे झालेल्या ॲसिड हल्ल्याप्रमाणे तुझ्यावर सुद्धा ॲसिड हल्ला करीन अशी धमकी दिली.

घडलेला प्रकार मुलीने मोलमजुरीच्या कामावरून सायंकाळी घरी आल्या नंतर आई-वडिलांना सांगितला. हा जाब विचारण्यासाठी पीडित मुलीचे आई- सार्थक बरसाने याच्या घरी गेली असता असता दोन्ही कुटुंबांमध्ये जोरदार शाब्दिक वाद झाला. या वादाचे रूपांतर हिंसाचारात झाले. यावेळी सार्थक बलसाने याने घरातून कोयता आणून पीडित मुलीच्या भावा वर हल्ला करत त्याला पाठीत जखमी केले. तसेच सार्थकची आई आश्विनी बलसाने हिने पीडित मुलीच्या आईवर हातोडीने हल्ला करून तिला जखमी केले. याशिवाय शिवीगाळ व जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्या.

परिसरातील नागरिकांनी हस्तक्षेप करत हाणामारी सोडवली. त्यानंतर पीडित मुलीच्या आईने थेट संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात धाव घेत सर्व प्रकार पोलिसांपुढे कथन केला त्यानंतर मुलीच्या आईच्या फिर्यादी वरून वरील तीन जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सार्थक बलसाने याचा गावातील महिलांना व नागरिकांना कायमच त्रास होत आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाने त्याच्यावर कठोरातील कठोर कारवाई करावी अशी मागणी जोर्वे गावच्या सरपंच प्रीती गोकुळ दिघे व उपस्थित महिलांनी पोलीस उपअधीक्षक डॉ कुणाल सोनवणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गावातील महिला सुरक्षेचा मुद्दा उपस्थित करत भविष्यामध्ये अशा घटना टाळण्यासाठी गावात कायम स्वरूपी २ पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी जोर्वेच्या सरपंच प्रीती गोकुळ दिघे यांनी मागणी केली.यावर गावात कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून दिल्यास दोन पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येईल, असे आश्वासन पोलीस उपाधीक्षक डॉ कुणाल सोनवणे आणि पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांनी महिलांना दिले दिले.

# गोदावरी पात्र कोरडे; पुणतांब्यात बेकायदा वाळू उपसा सुरू



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : येथील गोदावरी नदीपात्र कोरडे पडले असून, कोल्हापूर पद्धतीच्या वसंत बंधाऱ्यातील पाणीसाठाही दिवसेंदिवस घटत आहे. या पार्श्वभूमीवर सध्या नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात खुलेआम बेकायदा वाळूचा उपसा व वाहतूक सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. तसेच इतर गौण खनिजांचेही बेकायदा उत्खनन करून वाहतूक केली जात असल्याची माहिती समोर येत आहे. कोपरगाव तसेच भायगाव परिसरात बेकायदा वाळू व मुरुम उपसा करणाऱ्यांवर महसूल विभागाकडून अधूनमधून कारवाई केली जाते.

मात्र पुणतांबा येथे वाळू-मुरुम तस्करांवर कारवाई होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये संशय व्यक्त केला जात आहे. येथील नवीन रेल्वे फाटकाजवळ महसूल व पोलीस प्रशासनाने साध्या वेशात पाहणी केल्यास नदीपात्रातून दिवसाढवळ्या किती प्रमाणात वाळू व मुरुमाची वाहतूक सुरू आहे, याची वस्तुस्थिती समोर येईल, असे स्थानिकांचे म्हणणे आहे.

फाटकाजवळ पूर्व बाजूस काहीजण रात्रंदिवस थांबून अधिकाऱ्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवत असल्याचाही आरोप आहे. दरम्यान, पुणतांबा परिसरात बेकायदा वाळू उपशामध्ये काही स्थानिक मान्यवरांचे हितसंबंध गुंतले असल्याची चर्चा असून, त्यामुळेच संबंधित अधिकारी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.

# निमगाव जाळीचे सरपंच प्रतिभा जोंधळे यांचे पद कायम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : राजकीय दृष्ट्या महत्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या निमगाव जाळी चे लोकनियुक्त सरपंच प्रतिभा सोमनाथ जोंधळे यांच्या विरोधात अतिक्रमणाचे दाखल केलेले अपील नाशिक आयुक्त कार्यालयाने फेटाळून लावले आहे. आश्वी जिल्हा परिषद गटामधील सर्वात मोठी निमगावजाळी ग्रामपंचायत म्हणून ओळखली जाते. या ग्रामपंचायत ची निवडणूक सन २०२२-२०२३ मध्ये पार पडली होती. या निवडणुकीत लोकनियुक्त सरपंच महणून सौ प्रतिभा सोमनाथ जोंधळे हया प्रचंड बहुमताने निवडून आल्या आहेत. सरपंच सौ प्रतिभा सोमनाथ जोंधळे यांनी निमगाव जाळी गावातील तुळजाभवानी दुध संस्थेने अतिक्रमण केले आहे अशी तक्रार सदस्य सुरेश दगडू डेंगळे याने अहिल्यानगर जिल्हाधिकारी यांचेकडे अर्ज क्र. ८२/२०२३ अपील दाखल केले होते. अहिल्यानगर जिल्हाधिकारी यांनी दि.२० जानेवारी २०२५ रोजी सरपंच सौ प्रतिभा सोमनाथ जोंधळे यांच्या बाजूने निकाल देऊन सुरेश डेंगळे याचा अर्ज नामंजूर करून अपील फेटाळले होते. त्यानंतर सुरेश डेंगळे याने अहिल्यानगर जिल्हाधिकारी यांच्या निर्णयाचे विरोधात नाशिक अप्पर विभागीय आयुक्तांकडे ग्रामपंचायत अपील क्र. २९/२०२५ दाखल केले होते.

तक्रारदार सुरेश डेंगळे अप्पर विभागीय आयुक्तांपुढे निमगाव जाळी येथील तुळजाभवानी सह दुध उत्पादक संस्था संगमनेर लोणी रोड कडून निमगाव जाळी कडे येणाऱ्या गावठाण रोडच्या बाजूला असलेल्या सरकारी जागेमध्ये ग्रामपंचायतची कुठल्याही प्रकारची परवानगी न घेता अनधिकृतरित्या संस्थेचे बांधकाम केले आहे. आणि संस्थेची संस्थापक संचालक प्रतिभा सोमनाथ जोंधळे असल्याने त्यांना सरपंच पदावरून हटवण्यात यावे अशी तक्रारीत म्हटले होते. परंतु प्रतिभा सोमनाथ जोंधळे यांनी संस्थेची सर्व कागदपत्रांची पूर्तता असल्याचे विभागीय अप्पर आयुक्त यांना पुराव्यानिशी सादर करून विभागीय अप्पर आयुक्त अजय मोरे यांनी दोन्ही बाजूचा व्यक्तिवाद एकूण घेऊन तक्रारदार ह्याच्या म्हणण्यानुसार प्रतिभा सोमनाथ जोंधळे यांनी ग्रामपंचायतीचे मिळकतीत अतिक्रमण केले असले बाबत ग्रामपंचायत रेकॉर्डवर तशी नोंद नाही. तसेच प्रतिभा सोमनाथ जोंधळे यांनी अतिक्रमण केले बाबत तक्रारदार याने सबळ पुराव्यानिशी शिध्द करू शकले नाही. त्यामुळे सुरेश डेंगळे याचे अपील नामंजूर करून अहिल्यानगर जिल्हाधिकारी यांनी अपील क्र. ८२/२०२३ मधील दि. २० जानेवारी २०२५ रोजी पारित केलेला आदेश कायम करण्यात येत आहे असा निर्णय देऊन तक्रारदार याचा अपील फेटाळले आहे. यावेळी प्रतिभा सोमनाथ जोंधळे यांचे वतीने वकील ॲड. दत्तात्रय तिडके यांनी जोरदार व्यक्तिवाद करून अप्पर विभागीय अप्पर आयुक्त यांचे आदेशाने प्रतिभा सोमनाथ जोंधळे यांचे सरपंच पद कायम राहिले आहे.

## राज्यस्तरीय मराठी प्राविण्य परीक्षेत त्रिमूर्तीचे अनन्या व विवान जिल्हा यादीत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : नेवासा फाटा येथील स्वर्गीय मेजर साहेबराव घाडगे पाटील यांनी स्थापित केलेल्या त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती प्राथमिक विद्यालयाची विद्यार्थिनी अनन्या योगेश बुधे व विवान दिनेश घोडे या विद्यार्थ्यांनी मराठी राजभाषा संवर्धन संचलित राज्यस्तरीय मराठी प्राविण्य परीक्षेत जिल्हा यादीत नाव नोंदवले. मराठी राजभाषा संवर्धन संचलित घेण्यात येणारी राज्यस्तरीय मराठी प्राविण्य परीक्षा ही २४ जानेवारी २०२६ रोजी त्रिमूर्ती प्राथमिक विद्यालयात संपन्न झाली होती. मराठी राजभाषेचे संवर्धन होऊन मराठी भाषा व्याकरणिक दृष्ट्या आणखी सोपी व्हावी, या दृष्टीने ही परीक्षा घेतली जाते. इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत घेतल्या गेलेल्या या परीक्षेसाठी केंद्रातून २२५ विद्यार्थी तर जिल्ह्यातून सुमारे पाच हजार विद्यार्थी या परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते.

त्रिमूर्ती प्राथमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी अनन्या बुधे हिने २०० पैकी १६८ गुण मिळवून जिल्ह्यात चौथा क्रमांक मिळवला तर विवान घोडे याने २०० पैकी १६६ गुण मिळवत जिल्ह्यात पाचवा क्रमांक संपादित केला. वरील दोन्ही विद्यार्थी इयत्ता चौथी मध्ये शिकत आहेत. तसेच इयत्ता तिसरीमध्ये प्रत्यूष वणवे हा केंद्रात पहिला तर श्रद्धा खेडकर केंद्रात दुसरी तर तेजस्विनी पठाडे व अभिषेक जोंधळे यांनी केंद्रात तिसरा क्रमांक संपादित केला.इयत्ता चौथीमध्ये जानवी वैद्य ही केंद्रात पहिली तर आलिया देशमुख व ईश्वरी बानकर हे केंद्रात दुसरे, स्वामिनी वैद्य ही केंद्रात तिसरी आली आहे. वरील सर्वांना अर्जुन भांड, बाळासाहेब गटकळ,विक्रम मगर, प्रियांजली कराड, सुचिता जाधव, स्नेहा घाडगे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा अँड. सुमतीताई घाडगे,उपाध्यक्ष स्नेहलताई चव्हाण,सचिव मनीष घाडगे, सहसचिव डॉ. श्रुती आमले,विश्वस्त चेतन चव्हाण, डॉ. गौरव आमले, श्री दादासाहेब हरिभाऊ घाडगे पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सोपानराव काळे, त्रिमूर्ती प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक योगेश भवर यांनी कौतुक केले.

# सोनगावात श्रीराम नवमीचा जल्लोष

## ऐतिहासिक राममंदिरात भक्तीभावाचा महोत्सव



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव** : राहुरी तालुक्यातील सोनगाव येथील प्राचीन श्रीराम मंदिरात यंदाची श्रीराम नवमी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. गुरुवार (दि.२६ मार्च २०२६ ) रोजी श्रीराम मंदिर तथा अमृतेश्वर मंदिर येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभर सुरू असलेल्या या सोहळ्यामुळे संपूर्ण सोनगाव भक्तिरसात न्हाऊन निघाले.

सोनगावातील श्रीराम मंदिर हे ऐतिहासिक वारसा जपणारे मंदिर असून, या मंदिराचा प्रथम जीर्णोद्धार सन १९६९ मध्ये भगवानदास बिहारीलाल असावा (उर्फ रायलीशेठ) यांनी केला होता. त्यानंतर २०१९ साली मंदिराचे नूतन बांधकाम करण्यात आले असून मंदिर अधिक भव्य आणि आकर्षक स्वरूपात उभे आहे. याच परिसरात असलेल्या अमृतेश्वर मंदिरामुळे या ठिकाणाला धार्मिक दृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

श्रीराम नवमी निमित्त सकाळी भजन कार्यक्रमाने उत्सवाची सुरुवात झाली. गावातील भजन मंडळांनी श्रीरामाच्या नामस्मरणात रंग भरत भक्तिरसाची उधळण केली. वातावरणात जय श्रीराम चा घोष घुमत होता. दुपारी बारा वाजता श्रीराम जन्मोत्सवाचा मुख्य सोहळा पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. श्रीराम जन्माचा क्षण येताच उपस्थित भाविकांनी जयघोष करत वातावरण भारावून टाकले. मंदिर परिसरात मोठ्या संख्येने ग्रामस्थ, महिला व भाविक भक्त उपस्थित होते. या सोहळ्यास अशोक पाटिलबा अंत्रे, सुभाष जानजी अंत्रे, लक्ष्मण गोविंद अंत्रे, बाळासाहेब नामदेव अंत्रे, रामदास उमाजी कडनोर, नंदकुमार भिकाजी दिघे, डॉ. बोकंद, अजित जोर्वेकर, निलेश अंत्रे, हनुमान प्रधान सर, संतोष असावा, पवन लांडे, मच्छिन्द्र बाळाजी अंत्रे, पाराजी धनवट, विश्वनाथ कडनोर, भिकाजी धनवट, पोपट शिंदे, दत्तप्रसाद असावा, भगवान लांडे यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ व महिला भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. धार्मिक कार्यक्रमानंतर सर्व उपस्थितांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# स्वत:च्या क्षमतेवर विश्वास ठेवा

## यश आपोआप मिळेल : नितीन कोल्हे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव** : कोणत्याही व्यक्तीच्या यशामध्ये भाषा अडथळा ठरत नाही. स्वत:तील क्षमता ओळखून योग्य वेळी ती सिद्ध करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन नितीन कोल्हे यांनी केले. संजीवनी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये आयोजित राष्ट्रीय प्रकल्प स्पर्धा 'संजीवनी टेकफेस्ट'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

संजीवनी शैक्षणिक संकुलाचे संस्थापक स्व. शंकरराव कोल्हे यांच्या जयंतीनिमित्त इंडियन सोसायटी फॉर एज्युकेशनच्या सहकार्याने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नितीन कोल्हे होते. व्यासपीठावर विजय नायडू, डॉ. प्रसाद पटारे, रविंद्र जोशी, प्रकाश जाधव, डॉ. मकरंद कुलकर्णी आदी उपस्थित होते. प्रारंभी प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्पर्धेत ७५० हून अधिक विद्यार्थ्यांनी विविध प्रकल्प सादर करून नवोन्मेषी कल्पना मांडल्या. यावेळी डॉ. कुलकर्णी यांनी स्वागत केले, तर डॉ. पटारे यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला.

विजय नायडू यांनी स्पर्धेत सहभाग महत्त्वाचा असून त्यातून कौशल्यविकास होतो, असे सांगितले. रविंद्र जोशी यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात विद्यार्थ्यांनी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर पानोडीचा सुपुत्र पोलीस दलात

## सचिन पर्बत यांची मुंबईत नियुक्ती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी/आश्वी** : परिस्थिती कितीही बिकट असली तरी जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर यश संपादन करता येते, हे संगमनेर तालुक्यातील पानोडी येथील सचिन सिताराम पर्बत या युवकाने सिद्ध करून दाखवले आहे. अत्यंत गरिबीतून पोलीस होण्याचे स्वप्न उराशी बाळगून सचिनने पोलीस प्रशिक्षणाची खडतर पायरी यशस्वीपणे पार केली असून, आता तो मुंबई येथील वरळी येथे पोलीस सेवेत रुजू झाला आहे. सचिन पर्बत हा पानोडी येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबातील तरुण.

घरात आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची असतानाही त्याने शिक्षणाची जिद्द सोडली नाही. त्याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण (१० वी पर्यंत) पानोडी येथील सरदार शिवराव भवानराव थोरात विद्यालयात झाले. त्यानंतर पुढील उच्च शिक्षणासाठी त्याने आश्वी खुर्द येथील महाविद्यालयात प्रवेश घेतला. शिक्षणासाठी लागणारा खर्च आणि कुटुंबाची जबाबदारी पेलत त्याने आपले शिक्षण पूर्ण केले आणि पोलीस भरतीसाठी तयारी सुरू केली. सचिनची निवड पोलीस दलात झाल्यानंतर २३ जून २०२५ रोजी तो पोलीस ट्रेनिंग सेंटर, सोलापूर येथे प्रशिक्षणासाठी दाखल झाला होता.



नऊ महिन्यांच्या कठोर शारीरिक आणि मानसिक प्रशिक्षणानंतर, २४ मार्च २०२६ रोजी त्याने आपले प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. प्रशिक्षणादरम्यान दाखवलेली शिस्त आणि चिकाटीमुळे त्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर अवघ्या दुसऱ्याच दिवशी, म्हणजेच २५ मार्च २०२६ रोजी सचिन पर्बत हा मुंबई येथील वरळी विभागात पोलीस पदावर कार्यरत झाला आहे. एका ग्रामीण भागातील, शेतकरी कुटुंबातील मुलाने मुंबईसारख्या मोठ्या शहरात पोलीस दलात स्थान मिळवल्याने पानोडी गावासह संपूर्ण संगमनेर तालुक्यातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सचिनच्या या यशामुळे पानोडी गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्याने मिळवलेले हे यश ग्रामीण भागातील इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. त्याच्या या यशाबद्दल ग्रामस्थ, शिक्षक आणि मित्रपरिवाराकडून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

## पान १ वरुन

### तहसीलदार ज्योती देवरेंसह १५ महसूल अधिकारी सक्तीच्या रजेवर

कोणतीही गय केली जाणार नाही, असे स्पष्ट संकेत दिले होते. त्यानुसारच १५२ पैकी १५ अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवून शासनाने कठोर भूमिकेचा पहिला ठोस निर्णय घेतला आहे. सातबारातील फेरफार प्रकरणामुळे जमीन व्यवहारांबाबतचा विश्वास डळमळीत झाल्याची चर्चा सुरू असून, या कारवाईमुळे महसूल प्रशासनात पारदर्शकता आणि शिस्त प्रस्थापित करण्याचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.

सक्तीच्या रजेवर आदेश निर्गमित झालेल्या पंधरा अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे पुढीलप्रमाणे :

१) गीता गायकवाड (तत्कालीन अपर तहसीलदार, पिंपरी चिंचवड), उपजिल्हा निवडणूक अधिकारी,
२) श्रीमती ज्योती देवरे (तत्कालीन तहसीलदार, खेड), अपर तहसीलदार, मालेगाव (नाशिक),
३) रविंद्र सबनीस (तत्कालीन तहसीलदार, जुन्नर), (तहसीलदार व सहाय्यक प्राध्यापक), रामेती (ठअचएढख) पुणे, प्राचार्य, रामेती, पुणे,
४) व्यंकटेश माधवराव भोसले (तत्कालीन मंडळ अधिकारी, जुन्नर, मंडळ अधिकारी, आंबेगाव),
५) प्रल्हाद पाटील (तत्कालीन महसूल सहायक, जुन्नर)महसूल सहायक, आंबेगाव),
६) श्रीकांत पाटील (तत्कालीन तहसीलदार, इंदापूर), विशेष भूसंपादन अधिकारी, धाराशिव,
७) मलाप्पा तम्मा ढाणे (तत्कालीन मंडळ अधिकारी, बावडा, इंदापूर, मंडळ अधिकारी, जुन्नर),
८) मधुसुधन बर्गे (तत्कालीन तहसीलदार, मावळ), उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), नागपूर,
९) मारुती महादेव चोरमले (तत्कालीन मंडळ अधिकारी, शिवणे, मावळ) सध्या निलंबित (१५-०७-२०२५ पासून),
१०) अश्विनी व्यंकटराव गोरे (तत्कालीन ग्राम महसूल अधिकारी, शिवली, मावळ), ग्राम महसूल अधिकारी, शिवली, मावळ),
११) सुजाता गोविंदराव रच्चेवार (तत्कालीन ग्राम महसूल अधिकारी, कुरवंडे, मावळ), ग्राम महसूल अधिकारी, वराडे, मावळ,
१२) श्रीकांत कुलकर्णी (तत्कालीन लिपिक, मावळ), महसूल सहायक, तहसीलदार कार्यालय, पुणे शहर),
१३ सुरेश सोपानराव जगताप (तत्कालीन मंडळ अधिकारी, खडकाळा), सहाय्यक महसूल अधिकारी, खनिकर्म शाखा, पुणे,
१४ ज्ञानेश्वर सुदाम भराटे (तत्कालीन ग्राम महसूल अधिकारी, तळेगाव ढमढेरे), ग्राम महसूल अधिकारी, पाषाण (हवेली),
१५ संजय पाटील (तत्कालीन तहसीलदार, दौंड), उपजिल्हाधिकारी (करमणूक कर), मुंबई शहर,

### सोशल मीडियावरील आक्षेपार्ह वक्तव्य भोवले

शहर पोलीस पुढील तपास करीत आहेत. श्रीरामनवमी यात्रेच्या पूर्वसंध्येला झालेल्या या मारहाणीमुळे रात्री वातावरण तणावपुर्ण बनले होते. पोलीस परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचे समजते.

### साखर कारखान्यांकडे ६५0 कोटींची एफआरपी थकीत!

७० ते ८० शेतकऱ्यांना केवळ २१०० रुपये दर दिलेला आहे. याबाबत आज साखर सहसंचालक यांच्या निदर्शनास या बाबी आणुन दिल्या आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील अगस्ती, वृद्धेश्वर तसेच अशोक कारखान्याचे काही देणे अद्याप बाकी असल्याचे शेतकरी संघटनेचे म्हणणे आहे.

आर.आर.सी. कारवाई सुरु - ऊस नियंत्रण कायद्यानुसार, ऊस तुटल्यानंतर १४ दिवसांच्या आत एफ.आर.पी. देणे बंधनकारक आहे. विलंब झाल्यास १५% व्याजासह ही रक्कम देणे आवश्यक असते. ज्या कारखान्यांनी अद्याप मोठी थकबाकी ठेवली आहे, त्यांच्या साखरेच्या जप्तीचे आणि लिलावाचे आदेश साखर आयुक्तांकडून काढले जात आहेत.

### ऊर्जा संकटाशी टीम इंडिया म्हणून लढू

आहे. यावर पेट्रोलियम मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, भारताकडे कच्चे तेल आणि गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. नजीकच्या काळात अनेक तेलवाहू जहाजे भारतीय बंदरांवर दाखल होणार आहेत. नागरिकांनी घाबरून जाण्याचे किंवा साठेबाजी करण्याचे कारण नाही.

# शिवराई ग्रामपंचायतीत भ्रष्टाचार

## चौकशीसाठी ग्रामस्थांचे उपोषण

**दीपक बरकसे । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** पारदर्शक कारभाराचा दावा करणाऱ्या प्रशासकीय यंत्रणेला पुन्हा एकदा ग्रामस्थांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शिवराई येथील ग्रामपंचायत अंतर्गत सन २०२१ ते २०२६ या पाच वर्षांच्या कालावधीत १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप करत, ग्रामस्थांनी पुकारलेल्या आमरण उपोषणाचा आज दुसरा दिवस आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने, अखेर संतप्त ग्रामस्थांनी 'आरपारची लढाई' लढण्याचा पवित्रा घेतला आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गेल्या पाच वर्षांत ग्रामसेवक आणि सरपंच यांनी संगनमताने विकासकामांच्या नावाखाली सरकारी निधीचा अपहार केला आहे. यामध्ये रस्ते, पाणीपुरवठा आणि इतर नागरी सुविधांसाठी आलेला १५ व्या वित्त आयोगाचा निधी कागदोपत्री खर्च दाखवून प्रत्यक्षात मात्र निकृष्ट दर्जाची कामे करण्यात आली किंवा काही कामे केवळ कागदावरच राहिली आहेत, असा खळबळजनक आरोप आंदोलकांनी केला आहे.

या संदर्भात ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना (उएज) दिलेल्या निवेदनात स्पष्ट नमूद केले आहे की, त्यांनी यापूर्वी अनेकदा लेखी पत्रव्यवहार करून या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची मागणी केली होती. मात्र, प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ''आम्ही प्रशासनाला पुरेसा वेळ दिला, पण आम्हाला केवळ आश्वासने मिळाली. आता प्रत्यक्ष स्थळ पाहणी झाल्याशिवाय आणि दोषींवर कारवाई झाल्याशिवाय आम्ही मागे हटणार नाही,'' अशी आक्रमक भूमिका आंदोलकांनी घेतली आहे.

कडाक्याच्या उन्हाची पर्वा न करता ग्रामस्थ आपल्या मागणीवर ठाम आहेत. उपोषणकर्त्यांनी इशारा दिला आहे की, या




आंदोलनादरम्यान जर कोणाच्याही आरोग्यास इजा पोहचली किंवा कोणतीही जीवित अथवा वित्त हानी झाली, तर त्यास सर्वस्व जिल्हा परिषद प्रशासन जबाबदार राहील. लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या या आंदोलनाकडे आता जिल्हा प्रशासन कशा प्रकारे पाहते आणि प्रत्यक्ष स्थळ पाहणीचे आदेश कधी दिले जातात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अभय तेलतुंबडे यांना 'बीर बिरसा मुंडा' आंतरराष्ट्रीय सन्मान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव :** मुठेवाडगाव येथील समाजसेवक व रक्तमित्र अभयकुमार तेलतुंबडे यांना 'बीर बिरसा मुंडा आंतरराष्ट्रीय सन्मान पुरस्कार' प्रदान करण्यात आला. उत्तर प्रदेशातील सोनभद्र जिल्ह्यातील दुधीनगर येथे १५ मार्च रोजी प्रगती फाउंडेशनतर्फे आयोजित कार्यक्रमात हा गौरव करण्यात आला.तेलतुंबडे यांनी व्यवसाय व कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत सातत्याने समाजकार्य केले आहे. आतापर्यंत १२६ वेळा रक्तदान करून तसेच विविध शिबिरांच्या माध्यमातून अनेक रुग्णांना जीवनदान देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. थॅलेसेमिया, सिकलसेल निर्मूलन, अवयवदान व देहदानाबाबतही ते जनजागृती करत आहेत.कोरोना काळातील योगदानाबद्दल त्यांना 'कोरोना योद्धा' पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे. विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी त्यांचा यापूर्वीही गौरव झाला आहे. या सोहळ्यात देश-विदेशातील मान्यवरांच्या हस्ते शाल, प्रशस्तिपत्र व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल परिसरात कौतुक होत आहे.



## श्रीराम मंदिरावर पुष्पवृष्टी करून प्रभू श्रीरामचंद्रांचा जन्मोत्सव साजरा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** येथील पुरातन महिमा असलेल्या प्रभू श्रीराम मंदिरात रामनामाचा जयघोष व पुष्पवृष्टी करत पाळणा गाऊन प्रभू श्रीरामचंद्रांचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी सद्गुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर यांचे प्रभू रामचंद्राच्या जन्मावर किर्तन झाले.

श्रीरामनवमी उत्सव काळात दासबोध पारायणासह श्रीराम रक्षा स्रोत पठण, गीतांजली भक्ती संगीत कार्यक्रम, शास्त्रीय संगीत कार्यक्रम, उपासना,नामस्मरण, सत्संग कार्यक्रम,कृष्णाजी डहाळे यांचा अभंगवाणी कार्यक्रम, स्वाध्याय प्रवचन,रामायणाचार्य हभप धनंजय महाराज देशपांडे यांच्या सुश्राव्य वाणीतून श्रीराम चरित मानस कथा आदी कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडले.

यावेळी पुष्पवृष्टी करून भाविकांच्या उपस्थितीत जन्मोत्सव साजरा करण्यात आला उपस्थित महिलांनी पाळणा म्हटला.झालेल्या जन्मोत्सव सोहळा कार्यक्रमाचे वेदशास्त्रसंपन्न युवा पुरोहित निखिलगुरू जोशी यांनी केले

यावेळी सोहळयात योगदान देणाऱ्या दात्यांचा श्रीफळ प्रसाद देऊन श्रीराम मंदिर देवस्थान स्ट्रस्टच्या विश्वस्त मंडळींच्या वतीने सत्कार करण्यात आला उपस्थित हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करून आठ दिवस चाललेल्या श्रीराम जन्मोत्सव सोहळयाची सांगता करण्यात आली.

## नेवरगाव सर्कलमध्ये शिस्तीचा बडगा; वैजयंती शिरसाठ यांचा अधिकाऱ्यांना इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** नेवरगाव सर्कलच्या नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्या वैजयंती शिरसाठ यांनी पदभार स्वीकारताच शिक्षण व आरोग्य विभागाच्या आढावा बैठका घेऊन प्रशासनावर शिस्तीचा बडगा उगारला. कामकाजात हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसून नियमांनुसार कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

शिक्षण विभागाच्या बैठकीत जिल्हा परिषद शाळांतील पायाभूत सुविधा, शिक्षकांची उपलब्धता, विद्यार्थ्यांची उपस्थिती व शैक्षणिक गुणवत्तेचा आढावा घेण्यात आला. आढळलेल्या त्रुटी तातडीने दूर करण्याचे निर्देश देत शिक्षणाचा हक्क कायद्याअंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षण देणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच नेवरगाव सर्कलला मॉडेल सर्कल म्हणून विकसित करण्याचा संकल्प व्यक्त केला.आरोग्य विभागाच्या बैठकीत प्राथमिक आरोग्य सेवा, औषधसाठा, कर्मचारी उपस्थिती व रुग्णसेवेतील अडचणींचा आढावा घेण्यात आला. सेवेत कोणतीही हलगर्जी सहन केली जाणार नाही. गैरहजर कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असे त्यांनी सांगितले. बैठकीस वाल्मिक शिरसाठ, भागीनाथ मोरे, महेश बनसोडे, अरुण शेळके आदी उपस्थित होते.

## श्रीरामपुरात गावरान कांदा भाव १२००

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर, :** श्रीरामपूर कृषि उत्पन्न बाजार समितीत गावरान कांद्याला १२०० रुपये बाजारभाव जाहीर झाला असून काल गावरान कांदा १६४२ गोण्यांची आवक झाली आहे, भाव कालप्रमाणे आहे तसेच असून आवक मात्र काहीशी वाढली आहे, अशी माहिती बाजार समितीचे सभापती सुधीर नवले व प्र. सचिव साहेबराव वाबळे यांनी दिली. श्रीरामपूर कृषि उत्पन्न बाजार समितीत काल १६४२ गोण्यांची आवक झाली असून कांदा नंबर एक - १००० ते १२०० , कांदा नंबर दोन - ७०० ते ९५०, कांदा नंबर तीन - ३०० ते ६५०, गोल्टी - ६०० ते १०००, खाद - १०० ते ४०० असे भाव जाहीर झाले असल्याची माहिती सभापती सुधीर नवले, प्र. सचिव साहेबराव वाबळे यांनी दिली.

## निधन वार्ता

### बाळासाहेब एरंडे



**लोणी :** संगमनेर तालुक्यातील झोळे चंदनातुरी येथील बाळासाहेब देवराम एरंडे यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी संगमनेर रोडवर निमगाव जाळी शिवारात समृद्धी मंगल कार्यालय जवळ झालेल्या अपघातामध्ये त्यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा ,चार मुली भाऊ,पुतणी,पुतणे,सुना नातवंडे असा परिवार आहे.

### हेमंत दाभाडे यांची नियुक्ती



**वैजापूर :** येथील हेमंत हरिश्चंद्र दाभाडे यांची महाराष्ट्र शासनाने विशेष कार्यकारी अधिकारी पदी नियुक्ती केली आहे. दाभाडे हे रक्तदान चळवळीतील अर्थशतकी रक्तदाते आहेत. शासनाने त्याना गुणवंत कामगार पुरस्कार देऊन सन्मानित केले. क्रिडा व सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांची दखल घेऊन ही नियुक्ती केली. सुवर्णकार समाजातर्फे कालभैरवनाथ मंदिरामध्ये दाभाडे यांचा सत्कार करण्यात आला.

## अगरकानडगांव जि.प. शाळेत इदमीलन कार्यक्रमाचे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** तालुक्यातील अगरकानडगांव येथील जिल्हा परिषद शाळेत इदमीलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते विद्यार्थ्यांना शरखुर्मा खाऊ घालण्यात आला या कार्यक्रमाचे आयोजन शालेय अध्यक्ष खालील शेख, अबूजर इनामदार , इम्रान शेख यांनी केले होते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक हंसराज काळे,केंद्र प्रमुख नितीन जाधव, शिक्षक संदीप काळे,सचिन गोपाळे, शिक्षिका जयप्रभा कोकाटे,कविता पुरी, इंदुबाई ठोंबळ रुखमनबाई मिसाळ , इमरान शेख, मुश्ताक इनामदार,शौरभ बागुल,अमन शेख, सत्यजित चव्हाण,आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.



## हनुमंतगावच्या संदिप गावडे यांना राज्यस्तरीय पत्रकारिता सेवा पुरस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**सोनगाव :** रायगड जिल्ह्यात आयोजित करण्यात येणाऱ्या स्वराज्यभूमी रायगड गौरव संमेलन २०२६ मध्ये हनुमंतगाव येथील संदिप पुंजाराम गावडे यांची महाराष्ट्र पत्रकारिता सेवा पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.आई फाउंडेशन, रायगड (भारत) व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, रायगड जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने हा भव्य सोहळा आयोजित करण्यात आला आहे. पत्रकारिता क्षेत्रात प्रामाणिकपणे व निष्ठेने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत गावडे यांची निवड करण्यात आल्याचे आयोजकांनी नमूद केले.रायगडच्या ऐतिहासिक वारशाची प्रेरणा, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य मूल्यांची परंपरा तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्यायाच्या विचारांना अभिवादन करत विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींना या संमेलनात गौरविण्यात येणार आहे.हा पुरस्कार सोहळा शुक्रवार, दि. ३ एप्रिल २०२६ रोजी दुपारी २ वाजता रायगड येथे पार पडणार असून, गावडे यांनी उपस्थित राहून हा सन्मान स्वीकारावा, असे आवाहन करण्यात आले आहे.या यशाबद्दल संदिप गावडे यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## नशिबाची परिक्षा

**शुक्रवार दि .२७ मार्च २०२६**

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१२८ / ३८० / ३३५ — १-० — १९० / २८० / २४४

जोड: ०२-१८-४०-३५-६९

### कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

१४९ / २४८ / २२० — ४-६ — १५० / १६९ / ११४

जोड: ४१-०६-९२-७८-६५

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

१८० / २८९ / ३८८ — ९-२ — १५६ / २४६ / ६६०

जोड: ९७-४२-१३-८०-२५

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | | |

✼ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✼

# एअरबीएनबीकडून महाराष्ट्राच्या इव्हेंट टुरिझम वाढीवर शिक्कामोर्तब

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक :** एअरबीएनबीचा अलीकडेच प्रकाशित झालेला अहवाल 'अनलॉकिंग महाराष्ट्र इव्हेंट इकॉनॉमीः पॉवरिंग टुरिझम अँड लोकल कम्युनिटीज' मध्ये अधोरेखित करण्यात आले की प्रवासाला वाढत्या प्रमाणात अनुभवांमुळे चालना मिळत असल्याने महोत्सव, क्रीडा कार्यक्रम आणि सांस्कृतिक उत्सव महाराष्ट्रभर पर्यटनाची मागणी आणि पर्यटकांच्या खर्चाला वेग देत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र भारतातील कार्यक्रमकेंद्री प्रवासाचे प्रमुख केंद्र बनले आहे.

राज्यभरात मोठ्या प्रमाणावरील उपक्रमांमुळे पर्यटकांमध्ये मोठी वाढ होऊ लागली आहे. २०२३ मधील विश्वचषक सामन्यांदरम्यान, महाराष्ट्रात राहिलेल्या पाहुण्यांमध्ये वार्षिक स्तरावर ५० टक्के वाढ झाली. त्याचबरोबर सामन्याच्या तारखांदरम्यान पर्यटकांच्या चेक-इनमध्ये ७५ टक्के वाढ झाली. तसेच जानेवारी २०२५ मध्ये मुंबईतील कोल्डप्लेच्या कार्यक्रमादरम्यान बुकिंगमध्ये १०० टक्के वाढ झाली आणि मैफिलीच्या तारखांदरम्यान पाहुण्यांच्या संख्येत १७० टक्के वाढ झाली. पर्यटकांनी या क्षणांचे ट्रिप्समध्ये रूपांतर केले. हा कल पुढे लोलापलूझा इंडिया २०२६ सारख्या उत्सवांमध्ये प्रतिबिंबित झाला, जिथे मुंबईतील बुकिंगमध्ये वार्षिक स्तरावर ५० पेक्षा जास्त वाढ झाली आहे. जानेवारीमधील सर्व बुकिंगपैकी ८० टक्क्यांपेक्षा जास्त बुकिंग महोत्सवाच्या आठवड्यात होते.

अलीकडील सर्वेक्षणानुसार, तरुण भारतीय कार्यक्रमावर आधारित प्रवासावर अधिकाधिक खर्च करत आहेत. त्यातील प्रत्येक ट्रिपमध्ये सामान्यतः ५१,००० रुपये खर्च करतात आणि दहापैकी सहा प्रवासी त्यांच्या मासिक उत्पन्नाच्या २१-४० टक्के संगीतावर आधारित प्रवासावर खर्च करतात. कॉन्सर्टच्या तिकिटावर खर्च केलेल्या प्रत्येक एक हजार रूपयांमागे अतिरिक्त १५०० - २००० रूपये पर्यटन अर्थव्यवस्थेत, निवास, वाहतूक आणि स्थानिक व्यवसायांमध्ये विभाजित होतात.

एअरबीएनबीवरील खर्चाने २०२५ मध्ये भारताच्या अर्थव्यवस्थेत ८३.२ कोटी डॉलर्सपेक्षा जास्त योगदान दिले आणि विविध क्षेत्रांमध्ये २,२२,००० रोजगार निर्माण केले.

एअरबीएनबीचे भारत आणि आग्नेय आशियाचे राष्ट्रीय प्रमुख अमनप्रीत बजाज म्हणाले, ''कार्यक्रम वाढत्या प्रमाणात लोकांच्या प्रवास करण्याच्या पद्धतीला आकार देत आहेत आणि हे कसे दीर्घकाळ टिकते आणि अधिक स्थानिक आर्थिक घडामोडींमध्ये रूपांतरित होते हे महाराष्ट्र अनुभवतो आहे. ''राज्य मोठ्या प्रमाणावरील कार्यक्रमांना आकर्षित करत असल्याने पर्यटकांच्या मागणीला पाठिंबा देण्यासाठी आणि अधिकाधिक समुदायांना पर्यटनाच्या वाढीत सहभागी होण्यासाठी व त्याचा लाभ घेण्यासाठी पुरेशी निवास व्यवस्था शक्य करणे महत्त्वाचे ठरेल.

द ख ल



## दसरे नगरात श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा

**अहिल्यानगर** : शहरातील दसरे नगर परिसरात स्वराज प्रतिष्ठानच्या वतीने गुरुवारी (दि. २६ मार्च) श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या सोहळ्याला नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. उपस्थित महिला भाविकांनी भगवान श्रीराम जन्माचा पाळणा हलविला. कार्यक्रमाची सुरुवात प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. याप्रसंगी राम परिसर रामनामाच्या गजराने, भजन-कीर्तन, आरती आणि धार्मिक वातावरणाने भारावून गेला होता. उपस्थित भक्तांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेत श्रीराम जन्मोत्सवाचा आनंद लुटला. या कार्यक्रमास आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके, रूपालीताई वारे, संध्याताई पवार यांनीही कार्यक्रम ास उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवली या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी किशोर वाणी होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थितांमध्ये बाळकृष्ण नरवडे, भाऊसाहेब आव्हाड, अजित शहाणे, महादेव साबळे, वासुदेव आव्हाड, सारंग शहाणे, तुकाराम मिसाळ, राजू गीते, योगेश जावळे, मयूर सूर्य पुजारी तसेच शेखर बनकर यांची उपस्थिती होती.

## स्व. अरुण जगताप जयंतीनिमित्त किराणा वाटप

**अहिल्यानगर** : शिंगवे नाईक येथील माऊली सेवा प्रतिष्ठान संचलित मनगाव येथे स्वर्गीय आमदार अरुण काका जगताप यांच्या जयंतीनिमित्त गरजूंना किराणा वाटपाचा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातून समाजातील वंचित घटकांना मदतीचा हात देत काकांच्या कार्याची आठवण जागविण्यात आली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी सभापती कुमारसिंह वाकळे, नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, बाबुशेठ नागरगोजे, केशव नागरगोजे, नितीन घोडके, पंकज वाकळे, दीपक खेडकर, डॉ. राजेंद्र धामणे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. राजेंद्र धामणे म्हणाले की, स्वर्गीय अरुण काका जगताप यांनी राजकारणापेक्षा समाजकारणाला अधिक महत्त्व दिले. त्यांनी समाजाशी नाळ घट्ट जोडून ठेवत गोरगरिबांचे आधार बनण्याचे काम केले. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे चालू ठेवणे हीच खरी श्रद्धांजली असून अशा सामाजिक उपक्रमांतून सर्वसामान्यांच्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न होत आहे.

नगरसेवक संपत बारस्कर, कुमारसिंह वाकळे, डॉ. सागर बोरुडे आणि बाबुशेठ नागरगोजे यांनी सकारात्मक दृष्टिकोनातून सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम राबविला असून, या माध्यमातून काकांच्या कार्याची आठवण सतत जिवंत राहील, असेही त्यांनी नमूद केले.

संपत बारस्कर म्हणाले की, स्वर्गीय अरुण काका जगताप हे प्रत्येकाशी आत्मीयतेने संवाद साधत आणि लोकांना जेवणासाठी आग्रह करीत. अन्नदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. त्यामुळे अशा उपक्रमातून त्यांच्या विचारांचे अनुकरण करणे हे आपले कर्तव्य आहे.

# कांदा उत्पादकांसाठी ठाम लढा

## आ. काशिनाथ दातेंची अनुदानासाठी आक्रमक मागणी



कांद्याला किमान ५ रुपये प्रति किलो अनुदान देऊन शेतकऱ्यांना तातडीने दिलासा द्यावा, शेतकऱ्यांच्या वाढत्या उत्पादनखर्चाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय अत्यंत आवश्यक आहे, मुंबई विधानभवनात झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री सकारात्मक विचार करुन शेतकरी हिताचे निर्णय होईल.

**आ. काशिनाथ दाते सर (विधानसभा सदस्य)**

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर** : राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आज विधान भवन, मुंबई येथे मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सरांनी शेतकऱ्यांच्या हिताचा मुद्दा ठामपणे मांडत कांद्याला अनुदान देण्याची जोरदार मागणी केली.

उपमुख्यमंत्री ना. श्रीम. सुनेत्राताई पवार, जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे, ना. छगन भुजबळ, नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यातील आमदार तसेच कृषी, पणन व वित्त विभागाचे प्रधान सचिव या बैठकीस उपस्थित होते.

पारनेर मतदारसंघासह राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी गेल्या काही महिन्यांपासून अत्यंत कमी बाजारभावामुळे आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

या पार्श्वभूमीवर मतदारसंघातील शेतकऱ्यांनी वेळोवेळी विविध आंदोलनांद्वारे आपल्या हक्कासाठी आवाज उठवला आहे. या सर्व आंदोलनांची दखल घेत आणि शेतकरी हिताला प्राधान्य देत आमदार काशिनाथ दाते सरांनी बैठकीत ठाम भूमिका मांडली.

या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृषी, पणन व वित्त विभागाच्या प्रधान सचिवांची अभ्यास समिती स्थापन करून आठ दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य तो निर्णय घेऊन अनुदान मंजूर करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

या बैठकीत आमदार काशिनाथ दाते सरांनी शेतकऱ्यांच्या भावना प्रभावीपणे मांडत त्यांच्या न्याय्य हक्कासाठी सातत्याने लढा देण्याची भूमिका पुन्हा अधोरेखित केली. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना लवकरात लवकर दिलासा मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# वांगदरीच्या यात्रेची आखाड्याने सांगता



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** : वांगदरी येथे अंबिका मातेची दोन दिवस चाललेली यात्रा शांततेत पार पडली सोमवार आणि मंगळवार असे दोन दिवस चाललेल्या यात्रेची सांगता जंगी आखाड्याने करण्यात आली यावेळी तालुक्यातील व तालुक्या बाहेरील मल्लांनी यामध्ये मोठ्या संख्येने भाग घेतला कुस्तीला साजेसा असा खेळ या कुस्तीगीरांनी मैदानात दाखवला वजनावर झालेल्या कुस्त्या पाहण्यासारख्या होत्या. यावेळी नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यात्रा कमिटीचे अध्यक्ष साहेबराव महारानूर, खजिनदार शिवाजी चोरमले, सचिव राजेंद्र मासाळ यांच्या हस्ते मनाच्या कुस्त्या लावण्यात आल्या. या कुस्त्याच्या साठी पै.अजय रंदवे यांनी नियोजनात मदत केली. या वेळी ग्रामस्थ गावातील पदाधिकारी विशेष: तरुणांनी मोलाची मदत यात्रा शांततेत पार पाडवी म्हणून झाली असे मत वांगदरी गावच्या सरपंच सौ. सुजाता तुषार नागवडे, वांगदरी सोसायटीचे चेअरमन राजेंद्र निळकंठ नागवडे यांनी मांडले. यावेळी आजी माजी सरपंच ग्रा. सदस्य दोन्ही सोसायटीचे चेअरमन व्हा.चेअरमन संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात्रा शांततेत पार पाडली म्हणून मा. पंचायत समिती सदस्य विठ्ठलराव नागवडे यांनी सर्वांचे आभार मानले.

पहिल्या दिवशी दंडवत व अभिषेकाने देवींची विधिवत पूजा आरती होऊन यात्रेची सुरुवात झाली. दिसभर मंदिरात दर्शनासाठी भावीक भक्तांची मंदियाळी दिसून आली. यात्रा कमिटीने या वर्षी यात्रेत गोंधळ व हुल्लडबाजी रोखण्यासाठी सुरक्षिता म्हणून पोलीस प्रशासन यांच्या मदतीने अनेक सीसी टीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. त्यामुळे यात्रा आनंदात पार पडण्याकामी त्यांची मदत झाली. पहिल्या दिवशी वसंत नांदवळकर यांचा लोकानाट्य तमाशा शांततेत पार पडला.

# नान्नजचा अलमेर शेख बनला सनदी लेखापाल



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड** : जामखेड तालुक्यातील नान्नज येथील अलमेर हारुण शेख याने 'चार्टर्ड अकाउंटंट' (सीए) ही पदवी प्राप्त करून एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक आणि व्यावसायिक टप्पा गाठला आहे. देशातील अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या परीक्षांपैकी एक असलेल्या या अभ्यासक्रमात अलमेरने आपल्या सातत्यपूर्ण मेहनतीने, शिस्तबद्ध अभ्यासाने आणि जिद्दीने हे यश संपादन केले आहे.

अलमेरचा 'सीए' बनण्यापर्यंतचा हा प्रवास त्याच्या वैयक्तिक चिकाटीचा आणि भक्कम कौटुंबिक पाठबळाचा पुरावा आहे. अनेक वर्षांची खडतर तयारी आणि 'आर्टिकलशिप'च्या कालावधीत अलमेरने आपले पूर्ण लक्ष ध्येयावर केंद्रित केले. 'इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया'च्या (आयसीएआय) गुंतागुंतीच्या अभ्यासक्रमावर त्याने आपल्या प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर मात केली.

या यशाबद्दल बोलताना अलमेरने आपल्या कुटुंबाच्या पाठिंब्याला यशाचा मुख्य आधारस्तंभ मानले आहे. आपल्या यशाचे श्रेय त्याने आपली आई यास्मिन शेख यांना दिले असून, त्यांच्या अखंड प्रार्थनेने रात्रीच्या वेळी अभ्यास करताना आपल्याला मोठी प्रेरणा दिल्याचे त्याने आवर्जून सांगितले. तसेच, वडील हारुण याकूब शेख (निवृत्त उप-महाव्यवस्थापक, एमटीएनएल) यांच्या आर्थिक मदतीमुळे आणि अढळ विश्वासामुळेच कोणत्याही तडजोडीशिवाय शिक्षण पूर्ण करणे शक्य झाले, असेही तो म्हणाला.

अलमेरने कृतज्ञता व्यक्त करताना सांगितले की, हे यश जितके माझे आहे, तितकेच माझ्या पालकांचेही आहे. वडिलांचे कष्ट आणि आईचे आशीर्वाद हेच माझ्या प्रत्येक कठीण काळात माझे मुख्य आधारस्तंभ होते.

या पदवीसह अलमेर आता देशातील प्रख्यात आर्थिक तज्ज्ञांच्या श्रेणीत सामील झाला आहे. भविष्यात कराधान (टॅक्सटीओन) आणि वित्त (फायनस) या क्षेत्रांत आपले कौशल्य पणाला लावून देशाच्या आर्थिक प्रगतीत योगदान देण्याचा त्याचा मानस आहे.

अलमेर शेख हा नवीद शेख यांचा छोटा बंधू आहे अलमेर शेख यांनी चार्टर्ड अकाऊंटंट सीए परिक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचा नान्नज येथे संरपच महेंद्र मोहळकर, पत्रकार समीर शेख, अमर चाऊस, सदाम पठाण अजर पठाण, मजर पठाण, बापु साठे, शहारूक कुरेशी, इरफान पठाण, तुषार माकूडे, कालू पठाण आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# शेवगावात श्रीराम जन्मोत्सव उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अमरापुर** : शेवगाव येथील बाजारपेठ परिसरातील श्रीराम मंदिर, देवस्थानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रीराम मंदिराचा जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. गुरुवार दि. १९ मार्च २०२६ ते सोमवार दि. ३० मार्च २०२६ या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या उत्सवाच्या दरम्यान दररोज पहाटे ५ ते ७ या वेळेत काकड आरती, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, तसेच ६ ते ७ या वेळेत श्रीरामरक्षा, भीमरूपी स्तोत्र व हनुमान चालीसा पठण करण्यात येत होते. सायंकाळी ७ ते ८ या वेळेत श्रीरामाची आरती होत होती, ज्यामध्ये भाविकांचा मोठा सहभाग दिसून आला.



उत्सवातील विशेष आकर्षण म्हणजे आयोजित करण्यात आलेले कीर्तन सोहळे. ह.भ.प. श्रीपादबुवा गोंदीकर यांच्या सुश्राव्य कीर्तनांनी भक्तांना अध्यात्मिक आनंदाची अनुभूती दिली. मंगळवार दि. २४ मार्च व बुधवार दि. २५ मार्च २०२६ रोजी रात्री ९ ते ११ या वेळेत त्यांचे कीर्तन झाले. तसेच श्रीराम नवमी निमित्त गुरुवार दि. २६ मार्च रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत विशेष कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.

शुक्रवार दि. २७ मार्च रोजी श्रीराम मंदिराचा पालखी सोहळा मोठ्या भक्तिभावाने पार पडला. भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत वातावरण भक्तिमय केले.

सोमवार दि. ३० मार्च २०२६ रोजी काल्याचे भजन करून या भव्य धार्मिक सोहळ्याची सांगता करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शेवगाव मंदिर ट्रस्टच्या अध्यक्षांनी सर्व भक्त, देणगीदार व सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानले.



# निमगाव वाघा येथे श्रीराम नवमी उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : निमगाव वाघा (ता. नगर) येथे श्रीराम नवमीचा पवित्र उत्सव अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. गावात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याच्या निमित्ताने श्रीराम जन्मोत्सव मोठ्या श्रद्धेने पार पडला. गेली सलग ३९ वर्षे ही परंपरा कायम राखत दरवर्षी सप्ताहादरम्यान रामजन्मोत्सव साजरा झाला.

श्री नवनाथ महाराज मंदिरात हा धार्मिक सोहळा पार पडला. मंदिर परिसरात रामनामाच्या गजराने वातावरण भारावून गेले होते. महिलांनी पारंपरिक पद्धतीने पाळणा हलवून प्रभू श्रीरामांच्या जन्माचे स्वागत केले. त्याचबरोबर भक्तीगीत, अभंग व भजनांच्या सादरीकरणाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.

या सोहळ्यात आशाबाई ठाणगे, वीना बोडखे, कमल शिंदे, सुनीता डोंगरे, अनिता खांदवे, मंदा खळदकर, लता फलके, सुमन ठाणगे आदी महिलांचा उत्स्फुर्त सहभाग लाभला.

यावेळी माजी सरपंच साहेबराव बोडखे, सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे, भागचंद जाधव, प्रशांत जाधव, एकनाथ डोंगरे, नामदेव फलके, एकनाथ धायतडक, गोरख फलके गुरुजी, सखाराम फलके, ज्ञानदेव जाधव, अतुल फलके, मारुती फलके आदी मान्यवर उपस्थित होते.

ह.भ.प. विठ्ठल महाराज खळदकर यांनी सांगितले की, प्रभू श्रीरामांचा जन्म हा केवळ एक धार्मिक सोहळा नसून तो धर्म, नीती, आदर्श आणि कर्तव्यपरायणतेचा संदेश देणारा दिवस आहे. श्रीरामांनी आपल्या आयुष्यात सत्य, संयम, त्याग आणि कर्तव्यनिष्ठा यांचे पालन केले. आजच्या काळात प्रत्येकाने त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करण्याची गरज आहे.

# शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचवावे : आ.दाते

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**पारनेर** : कान्हुर पठार ता. पारनेर महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर आज उत्साहात व मोठ्या प्रतिसादात पार पडले. या शिबिरात पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी जनतेच्या समस्या थेट ऐकून त्यावर तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देत प्रशासनाला अधिक लोकाभिमुख होण्याचे आवाहन केले.

या शिबिरात भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, तहसीलदार गायत्री सौंदाने, तालुका कृषी अधिकारी गजानन घुले, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, स्वप्नील ठुबे, अर्जुन नवले, संतोष ठुबे, बाबा चेडे, रमेश गाडगे यांसह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी आमदार दाते म्हणाले, शासनाच्या योजना व सेवा या कागदावर न राहता थेट जनतेपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. गावपातळीवर अशा शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांच्या अडचणी जागेवरच सोडवणे, हेच प्रशासनाचे खरे यश आहे.

# आयुष क्षेत्र बळकट करा

## खासदार नीलेश लंके यांची संसदेत मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**पारनेर** : देशातील आयुष क्षेत्र अधिक सक्षम व व्यापक करण्यासाठी खासदार नीलेश लंके यांनी आयुष मंत्रालयाच्या सल्लागार समितीच्या बैठकीत सक्रिय सहभाग नोंदवत विविध महत्त्वाचे मुद्दे ठामपणे मांडले.

सदर बैठकीत आयुर्वेद, योग, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी या उपचार पद्धतींचा देशभर विस्तार, तसेच या सेवा ग्रामीण व दुर्गम भागांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. खासदार लंके यांनी जनतेच्या अपेक्षा, अडचणी आणि आयुष सेवांतील मर्यादा यांची थेट मांडणी करत आवश्यक सुधारणा करण्याची गरज अधोरेखित केली.

विशेषतः ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा मजबूत करण्यासाठी आयुष सेवांचा अधिक व्यापक वापर, प्रशिक्षित मनुष्यबळाची उपलब्धता, तसेच योजनांची प्रभावी अंमलबजावणी यावर त्यांनी भर दिला.

बैठकीदरम्यान खासदार लंके यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देताना केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी मंत्रालयाच्या विविध योजनांचा आढावा सादर केला. तसेच आयुष क्षेत्राच्या विस्तारासाठी राबविण्यात येणाऱ्या धोरणात्मक उपक्रमांची माहिती दिली.

आयुष क्षेत्र मजबूत झाल्यास देशाच्या एकूण आरोग्य व्यवस्थेला मोठी ताकद मिळेल. संसदेत आणि समित्यांमध्ये जनतेच्या आरोग्याशी संबंधित प्रश्न ठामपणे मांडणे ही माझी जबाबदारी आहे, असे खासदार लंके यांनी यावेळी सांगितले.

जनतेच्या पाठिंबा आणि विश्वासामुळेच त्यांच्या समस्या थेट केंद्रापर्यंत पोहोचवणे शक्य होत असल्याचे नमूद करत, पुढील काळातही जनहिताच्या मुद्द्यांवर सातत्याने काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

# श्रीगोंद्यात वाढदिवस केकचा नाही, कर्तृत्वाचा!



### विश्वासाची गुंतवणूक

ही मदत फक्त पैशांची नाही, आमच्या कार्यावरचा विश्वास आहे, अशी भावना व्यक्त करत संस्थेने सर्व मान्यवरांचे आभार मानले.

### सहारा संस्थेच्या माध्यमातून लवकरच

- अनाथ व निराधार मुलांसाठी निवासी शिक्षण
- ऊसतोड मजूर व कचरा वेचणाऱ्या मुलांसाठी आधार
- कायदे, शासन निर्णय (ऋठ), संविधान मार्गदर्शन
- महिला सक्षमीकरण आणि नागरिकांना न्याय

**श्रीगोंदा :** आजकाल वाढदिवस म्हणजे केक, कॅण्डल आणि इंस्टाग्राम स्टोरी पण काही लोक ट्रेंड फॉलो करत नाहीत ते ट्रेंड सेट करतात! असाच एक प्रकार श्रीगोंदयात पाहण्यास मिळाला

यातूनच वेगळा आदर्श निर्माण करत युवा उद्योजक लक्ष्मण नगरे साहेब यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त सहारा सर्वांगीण विकास संस्थाला तब्बल छ५१,००० ची मदत देत समाजकार्यास खऱ्या अर्थाने हातभार लावला आहे. शून्यातून उभं राहण्याचं बळ ही फक्त ओळ नाही, तर आज त्यांनी ती कृतीत उतरवली. त्यांच्या हस्ते संस्थेच्या कार्यालय, ट्रेनिंग सेंटर व निवासी प्रकल्पासाठी भूमिपूजन पार पडले. वाढदिवस केवळ औपचारिक न ठेवता, भारतीय संविधानाची उद्देशिका भेट देत सामाजिक जाणीव जागवणारा अनोखा उपक्रमही यावेळी राबवण्यात आला.यामध्ये ज्ञानदान अधिक समाजसेवा यातूनच खरा सेलिब्रेशन पाहण्यास मिळाला आहे कार्यक्रमात शिक्षणक्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व विजय काकडे सर यांनी ११,१११, तर सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत थोरात साहेब यांनी ५,००० ची मदत देत या उपक्रमाला बळ दिले. त्यावेळी बोलताना काकडे सरांनी दिलेला संदेश थेट हृदयाला भिडणारा संदेश दिला आहे ते म्हणतातशिक्षणासाठी आम्ही सदैव तुमच्या पाठीशी आहोत. असेही काकडे यांनी बोलताना सांगितले

या कार्यक्रमास दादासाहेब नगरे, सुनील म्हस्के, प्रकाश काकडे, संजय काकडे, भरत काकडे, मारुती शेलार, नामजी जठार, छाया भोसले, रवींद्र चव्हाण, बबन गोरखे, केशव दळवी, दत्ता गोसावी, उत्तम दळवी, रवींद्र डांगे, अजय खोमणे, निखिल गोरखे, अनिल नेटवटे, मंगेश गोरखे आदी उपस्थित होते.

दखल

## पोंदेवाडीत ट्रांसफार्मर चोरीला

**लोणी धामणी :** पोंदेवाडी ( ता. आंबेगाव ) येथील पोखरकरवस्ती जवळील महावितरण कंपनीचा ट्रांसफार्मर बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी डीपी स्ट्रक्चर वरून खाली पाडली व ती फोडण्यात आली या घटनेमुळे पोखरकर वस्ती व वाळुंज वस्ती येथील तीस ते पस्तीस घरे अंधारात आहे महावितरण कंपनीने तात्काळ दुसरा ट्रांसफार्मर बसवावा व पोलीस प्रशासनाने अज्ञात चोरट्यांचा शोध घेऊन त्यांना जेरबंद करावे अशी मागणी खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष अनिल वाळुंज, पोंदेवाडीचे माजी उपसरपंच संदीप पोखरकर यांनी केली आहे घटनास्थळी महावितरण कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांनी भेट देऊन परिस्थितीची पहाणी केली आहे आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात डीपी ( ट्रांसफार्मर ) चोरी करणारी टोळी सक्रिय असण्याची शक्यता नाकारता येत नाही याबाबत निरगुडसर येथील महावितरण कंपनीचे सहायक अभियंता नितेश भासरकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी असे सांगितले की यापूर्वी भराडी २, जारकरवाडी १, चांडोह १, आणि आता पोंदेवाडी १ अशी आज्ञात चोरट्यांनी ट्रांसफार्मरची चोरी केली आहे या सर्व घटनेची फिर्याद पोलीस स्टेशनला दिलेली आहे सध्या उन्हाळ्याचे दिवस असून शेतकऱ्यांना शेताला पाणी देण्यासाठी व घरात वीजेची गरज भासत आहे तसेच या परिसरात बिबट्यांचे वास्तव्य आहे ट्रांसफार्मर चोरीमुळे शेतकऱ्यांचा नुकसान होत आहे पोंदेवाडी येथे तात्काळ ट्रांसफार्मर बसविणार असल्याचे सहाय्यक अभियंता भासरकर यांनी सांगितले.



## सासवड येथे सादर केला ''अंक चमत्कार ''कार्यक्रम

**नितीन यादव ! राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** प्रत्येक व्यक्तीची जन्म तारीख तसेच त्याचे जन्मवर्ष यावरून त्याचा जन्मअंक त्याचप्रमाणे भाग्यांक काढून त्या व्यक्तीची स्वभाव वैशिष्ट्ये, त्याची ग्रह प्रतीके याची सुंदर मांडणी करत सासवड येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात प्रख्यात अंकशास्त्रज्ञ आणि समुपदेशक उल्का चौधरी (राठी) यांनी उपस्थितांची वाहवा मिळवली. नाट्य स्वरूपातील रंगभूमीवरील पहिल्याच ''अंक चमत्कार '' या




प्रयोगाचे आयोजन स्व एकनाथ जगताप प्रतिष्ठानच्या माध्यमातून करण्यात आले होते. आपल्या दोन तासांच्या सादरीकरणात उल्का चौधरी यांनी जन्मअंक, भाग्यांक काढून व्यक्ती स्वभाव, यशस्वी जीवनाची वाटचाल यावर भाष्य केले. महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री, इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी, बाळासाहेब ठाकरे,नरेंद्र मोदी ते दिलीप कुमार, राजेश खन्ना, किशोर कुमार , रजनीकांत,माधुरी दीक्षित लता मंगेशकर, अमिताभ बच्चन , सचिन तेंडुलकर आदींच्या जन्म तारखांनुसार त्यांची महती विषद केली. स्क्रीन वरीलन विषयानुरूप सांगीतिक मांडणी, ध्वनी व प्रकाश योजनेचा उत्तम वापर व कोणत्याही अंधश्रद्धेला स्पर्श न करणारा हा कार्यक्रम उपस्थितांना मंत्रमुग्ध करून गेला. स्व एकनाथ जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप व सचिव हेमंत ताकवले यांनी केलेले सर्वांचे स्वागत, संजय वाकचौरे यांची ध्वनी व्यवस्था, योगेश सातपुते यांची प्रकाश योजना, विजय जोशी यांची निर्मिती व संकल्पना, किशोर साव यांचे दिग्दर्शन या कार्यक्रम यशस्वी करण्यात जमेच्या बाजू ठरल्या. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर विशेष करून महिलांची संख्या लक्षणीय होती.

## किसान विकासच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी प्रा. शेटे यांची पुनर्निवड



**कवठे येमाई :** युवा क्रांती फाउंडेशन अंतर्गत राष्ट्रीय किसान विकास मंच, माहिती अधिकार संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी प्रा. सुभाष शेटे यांची श्रीराम नवमीच्या शुभमुहूर्तावर पुनर्निवड करण्यात आली. तसेच हभप नाना महाराज कापडणीस यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी फेरनिवड झाली. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व राष्ट्रीय महासचिव रविंद्र सूर्यवंशी यांनी नियुक्तीपत्र प्रदान केले. प्रा. शेटे गेल्या दोन दशकांपासून पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी अनेक गरजू नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी योगदान दिले आहे. निवडीनंतर प्रा. शेटे यांनी राज्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी संघटनेचे कार्य तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त केला. शेतीविषयक प्रलंबित प्रश्न, पाणंद रस्ते, शासकीय कामांतील अडचणी यावर संघटनेच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या निवडीबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# 'फार्मर कप' स्पर्धेत लाखोंची बक्षिसे
## शिरूर तालुक्यातून मोठ्या सहभागाचे आवाहन




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** – राज्यातील शेतकऱ्यांसाठी एक अभूतपूर्व संधी उपलब्ध झाली असून 'फार्मर कप' ही स्पर्धा शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना थेट बक्षीस देणारी जगातील एकमेव स्पर्धा म्हणून ओळखली जात आहे. या स्पर्धेत सहभागी होऊन शेतकरी गटांना लाखोंची बक्षिसे जिंकण्याची संधी मिळणार असल्याची माहिती कवठे येमाई विभागाचे सहायक कृषी अधिकारी नंदू जाधव यांनी बोलताना सांगितले.

राज्यस्तरावर प्रथम क्रमांकासाठी तब्बल ५० लाख रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ३० लाख रुपये तर तृतीय क्रमांकासाठी २० लाख रुपये अशी आकर्षक बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे महिलांसाठी स्वतंत्र गटांना प्रोत्साहन देण्यात आले असून राज्यातील पहिल्या तीन महिला गटांना प्रत्येकी १० लाख रुपयांचे बक्षीस मिळणार आहे.

राज्यस्तरावर क्रमांक न मिळाल्यासही शेतकऱ्यांना जिल्हास्तरावर संधी आहे. जिल्ह्यात प्रथम क्रमांकासाठी ५ लाख, द्वितीय साठी ३ लाख आणि तृतीयसाठी २ लाख रुपये बक्षीस दिले जाणार आहे. त्यामुळे प्रत्येक गावातून अधिकाधिक शेतकरी गटांनी सहभाग नोंदवण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

**गटशेतीवर भर – यशाची गुरुकिल्ली**

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी किमान ११ कुटुंबांचा गट तयार करणे आवश्यक असून त्या गटाने एकत्रित किमान १५ एकर क्षेत्रावर एकच पीक घेण्याची तयारी असणे गरजेचे आहे. गट बांधणीसाठी 'पाणी फाउंडेशन'च्या प्रशिक्षण घेतलेल्या निमंत्रकाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.शेतकऱ्यांना स्पर्धेबाबत अधिक माहिती व मार्गदर्शन मिळावे यासाठी दर सोमवार ते शुक्रवार सकाळी १० वाजता व सायंकाळी ६ वाजता ऑनलाईन झूम मीटिंगचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुक शेतकरी या मीटिंगमध्ये सहभागी होऊन आपले प्रश्न सोडवू शकतात.**शासन व संस्थांचा पुढाकार**महाराष्ट्र शासन कृषी विभाग, पाणी फाउंडेशन आणि उमेद अभियान यांच्या संयुक्त पुढाकारातून ही स्पर्धा राबविण्यात येत असून शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी व गटशेतीला चालना देण्यासाठी हा महत्त्वाचा उपक्रम मानला जात आहे.यंदाचा फार्मर कप आपल्या शिरूर तालुक्यात आणायचा, या उद्देशाने शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी एकजुटीने पुढे येत गट तयार करून या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन ही तालुका कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## दिवे–काळेवाडी परिसरात श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**दिवे :** दिवे, काळेवाडी (ता. पुरंदर) परिसरात श्रीराम जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. दिवे, काळेवाडी, झेंडेवाडी, जाधववाडी, पवारवाडी आदी ठिकाणी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.काळेवाडी येथे ग्रामस्थांच्या लोकवर्गणीतून श्रीराम मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला असून, यानिमित्ताने यंदाचा जन्मोत्सव विशेष उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी अभिषेक व पूजा संपन्न झाल्यानंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले. यावेळी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.यानंतर काळेवाडी ग्रामस्थांच्या वतीने प्रभू श्रीरामांच्या पादुकांची भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत महिला भगिनींचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. ढोल–ताशांच्या गजरात आणि जय श्रीरामच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. ह.भ.प. परसराम महाराज काळे यांच्या कीर्तन सेवेने कार्यक्रमाला धार्मिक रंग चढला. त्यांच्या प्रभावी कीर्तनामुळे उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. दुपारी बारा वाजता पारंपरिक पद्धतीने श्रीराम जन्म सोहळा साजरा करण्यात आला.अशी माहिती जलदूत सागर तात्या काळे यांनी दिली यानंतर ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या महाप्रसादाचा लाभ मोठ्या संख्येने भाविकांनी घेतला. परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.



दिवे (काळेवाडी )ता. पुरंदर येथे उपस्थित ग्रामस्थ

## सासवड संगमेश्वर मंदिर-घाट विकासासाठी निधी संजय चंद्रकांत जगताप यांचे मुख्यमंत्र्यांचे आभार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** येथील पांडवकालीन संगमेश्वर मंदिर व कऱ्हानदी घाट परिसराच्या विकासासाठी अतिरिक्त निधीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्राथमिक मान्यता दिल्याबद्दल माजी आमदार संजय जगताप यांनी आभार व्यक्त केले. सासवड परिसरातील ऐतिहासिक व धार्मिक वारसा जपण्यासाठी संगमेश्वर मंदिर आणि कऱ्हानदी घाटाचा विकास करणे आवश्यक असल्याची मागणी माजी आमदार संजय चंद्रकांत जगताप यांनी सातत्याने लावून धरली होती. या मागणीची दखल घेत राज्य शासनाने प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत अतिरिक्त निधीस प्राथमिक मान्यता दिली आहे.



या निधीतून मंदिर परिसराचे सुशोभीकरण, घाटांचे मजबुतीकरण, तसेच पर्यटकांसाठी मूलभूत सुविधा उभारण्यावर भर दिला जाणार आहे. या विकासकामामुळे सासवड परिसरातील धार्मिक पर्यटनाला चालना मिळणार असून स्थानिक अर्थव्यवस्थेलाही बळकटी मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या असून लवकरच सविस्तर आराखडा मंजूर करून प्रत्यक्ष कामांना सुरुवात होणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

सासवडच्या संगमेश्वर मंदिर व कऱ्हानदी घाटाचा विकास हा परिसराच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरेल. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या प्राथमिक मान्यतेबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. लवकरच आराखडा मंजूर करून काम पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल. – **संजय चंद्रकांत जगताप, माजी आमदार, पुरंदर हवेली**

## ३४ लाखांहून अधिक रकमेच्या आर्थिक फसवणुकीचा भंडाफोड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती शहर पोलीस स्टेशन येथे नोंद दाखल असलेल्या गंभीर आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यातील आरोपी दत्तात्रय पोपटराव खुळे (रा. माळेगाव ता. बारामती जि. पुणे) यास तब्बल ६ महिन्यांपासून फरार असताना अखेर बारामती शहर पोलीसांनी गोपनीय माहितीच्या आधारे अत्यंत कौशल्यपूर्ण व नियोजनबद्ध कारवाई करून जेरबंद करण्यात यश मिळविले आहे.सदर गुन्ह्यामध्ये आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करून हॉटेल व्यवसायातील व्यवस्थापक म्हणून काम करताना ग्राहकांची बनावट नावे नोंदवून, उधारी दाखवून व आर्थिक व्यवहारात फेरफार करून तब्बल ३४,३३३९३ (चौतीस लाख



तेहतीस हजार तीनशे त्र्याण्णव रुपये) इतक्या रकमेचा अपहार केल्याचे निष्पन्न झाले आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपीने जाणीवपूर्वक फरार राहून पोलिसांना चकवा देण्याचा प्रयत्न केला होता. तथापि, बारामती शहर पोलीसांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा, तांत्रिक तपास व गोपनीय बातमीदारांच्या जाळ्याचा प्रभावी वापर करून आरोपीचा ठावठिकाणा शोधून काढला व,त्यास अत्यंत शिताफीने ताब्यात घेऊन कायदेशीर अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे गुन्हेगार कितीही चतुर असला तरी कायद्याच्या कचाट्यातून सुटू शकत नाही हा ठोस संदेश समाजात पोहोचला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड, तसेच प्रभारी पोलीस निरीक्षक चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## पावसाच्या पार्श्वभूमीवर पालखी सोहळ्याची तयारी; प्रशासनाला सज्जतेच्या सूचना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे :** जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात श्री संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आळंदी येथून प्रस्थान करणार असल्यामुळे पावसाची दाट शक्यता असून, भाविकांच्या सोयीसुविधांसाठी प्रशासनाने पूर्ण तयारीत राहावे, अशा सूचना ॲड. राजेंद्र बा. उमाप (पालखी सोहळा प्रमुख) यांनी दिल्या. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर सासवड नगरपरिषद हद्दीतील पालखी तळ व पालखी मार्गाची पाहणी करण्यात आली. यावेळी पावसाळ्यात उद्भवणाऱ्या अडचणींचा विचार करून निवास व्यवस्था, तात्पुरते शेड्स, पिण्याचे पाणी, स्वच्छता, आरोग्य सेवा आणि वाहतूक नियंत्रण यावर विशेष भर देण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या.

यंदा पालखी लवकर निघत असल्यामुळे पावसाचा परिणाम अधिक जाणवण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. लाखो वारकऱ्यांच्या निवासासाठी सक्षम आणि सुरक्षित व्यवस्था उभारणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले.दरम्यान, दिवे घाटातील सुरू असलेल्या कामांबाबत साशंकता व्यक्त करण्यात आली. पालखीपूर्वी कामे पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या असून, सर्व्हिस रोडवर उभे असलेले एमएसईबीचे वीज पोल अडथळा ठरत असल्याचे निदर्शनास आले. हे पोल हटवण्यासाठी संबंधित विभागाशी संपर्क साधण्यात आला असून, याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करण्यात येणार आहे.

तसेच पालखी तळ अपुरे पडत असल्याचा प्रश्नही पुढे आला आहे. वारकऱ्यांची वाढती संख्या लक्षात घेता नवीन जागा उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव प्रलंबित असून, यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीत लवकरच निर्णय अपेक्षित आहे दरवर्षीप्रमाणे यंदाही वारकऱ्यांची संख्या वाढण्याची शक्यता असून, प्रशासन आणि संस्थान समितीने अधिक व्यापक नियोजन करण्याची गरज व्यक्त केली आहे. गेल्या वर्षीपेक्षा यंदा अधिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. या पाहणी दौऱ्यात सासवड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, उपाध्यक्ष मनोहर तात्या जगताप, आरोग्य सभापती राजन भैय्या जगताप, बांधकाम सभापती ज्ञानेश्वर जगताप, नगरसेवक प्रदीप राऊत, नगरसेविका अर्चनाताई जगताप, यशवंतकाका जगताप, साकेतदादा जगताप उपस्थित होते. तसेच योगी निरंजननाथ गुरु शांतीनाथ (विश्वस्त), . चैतन्य महाराज लोंढे (कबीर बुवा) (विश्वस्त), ज्ञानेश्वर वीर (व्यवस्थापक), ऋषिकेश पवार (पालखी सोहळा मालक), राजाभाऊ चोपदार, वैष्णव चोपदार, मारुतराव कोकाटे, माऊली महाराज मोरे यांची उपस्थिती होती.

जुलैमध्ये पालखी निघत असल्यामुळे पावसाची शक्यता अधिक आहे. त्यामुळे भाविकांच्या निवास व सुरक्षेची व्यवस्था कोणत्याही परिस्थितीत ढासळू नये, यासाठी प्रशासनाने सज्ज राहणे आवश्यक आहे, असे ॲड. राजेंद्र बा. उमाप (पालखी सोहळा प्रमुख) यांनी सांगितले.

**जाहीर आवाहन**

सर्व लोकांना कळवण्यात येते की, संजीव कृष्णराव शितोळे मुक्काम पोस्ट बिजलीनगर पूनम सुपर मार्केट जवळ चिंचवडगाव पुणे ४११०३३ यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारी वाहने नंबर MH14 FR5703,MH14FQ4158,MH14 GY6590 सदर वाहने त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती शितल संजीव शितोळे यांच्या नावावर सदर वाहने करण्यात येणार असून याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास पंधरा दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून पुढील पूर्तता करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**दिनांक-२७/०३/२०२६**
**श्रीमती शितल संजीव शितोळे.**
**बिजलीनगर पूनम सुपर मार्केट**
**जवळ चिंचवडगाव पुणे ४११०३३**

**जाहीर आवाहन**

सर्व लोकांना कळवण्यात येते की, शिवाजी खंडू भांबुरे मुक्काम पोस्ट चांडोली तालुका खेड जिल्हा पुणे४१०५०५ यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे चार चाकी वाहन नंबर MH14MC5098 असा असून चासी नं ४६१५७, इंजिन नं ४४२८५ सदर वाहने त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती अश्विनी शिवाजी भांबुरे यांच्या नावावर सदर वाहने करण्यात येणार असून याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास पंधरा दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून पुढील पूर्तता करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**दिनांक-२७/०३/२०२६**
**श्रीमती अश्विनी शिवाजी भांबुरे**
**मुक्काम पोस्ट चांडोली ता. खेड,**
**जिल्हा पुणे ४१०५०५**

## महाविस्तार ॲप नोंदणीबाबत शेतकऱ्यांना इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील कवठे येमाई, मुंजाळवाडी, इचकेवाडी या गावातील ज्या शेतकरी बांधवांचे अद्याप महाविस्तार ॲपवर नोंदणी (रजिस्ट्रेशन) झालेले नाही, त्यांनी तातडीने नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन या विभागाचे सहायक कृषि अधिकारी नंदू जाधव यांनी केले आहे. शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी ही नोंदणी अत्यावश्यक असल्याने दुर्लक्ष करणाऱ्या शेतकऱ्यांना भविष्यात तोटा सहन करावा लागू शकतो.सध्या अनेक शेतकरी तांत्रिक कारणे, माहितीचा अभाव किंवा दुर्लक्षामुळे नोंदणीपासून



दूर आहेत. मात्र वेळेत नोंदणी न केल्यास शासकीय अनुदान, योजना व इतर लाभ मिळण्यास अडथळे निर्माण होऊ शकतात. असे मंडल कृषि अधिकारी शिवाजी पाटील हे शेतकऱ्यांना माहिती देताना बोलत होते.नोंदणी करताना कोणतीही अडचण येत असल्यास संबंधित कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांशी किंवा स्थानिक मार्गदर्शकांशी त्वरित संपर्क साधावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.दरम्यान, प्रशासनानेही या प्रक्रियेला गती देण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांनी आजच पाऊल उचलावे, उद्या उशीर होऊ शकतो, असा स्पष्ट इशारा सहायक कृषि अधिकारी नंदू जाधव यांच्याकडून देण्यात आला आहे.

## कांदा पिकात सोडल्या मेंढ्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**दिवे :** दिवे (ता. पुरंदर) येथील प्रगतशील शेतकरी उमेश झेंडे यांनी यंदाच्या हंगामात दोन एकर क्षेत्रावर कांद्याची यांत्रिक पद्धतीने पेरणी करून चांगल्या उत्पादनाची अपेक्षा धरली होती. मात्र ऐन मार्च महिन्यात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आणि त्यातच बाजारभावही अपेक्षेप्रमाणे न मिळाल्याने त्यांच्या कांदा पिकाचे मोठे नुकसान झाले. कांदा पिकासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करूनही उत्पादन खर्च वसूल होण्याची चिन्हे दिसत नसल्याने झेंडे यांनी अखेर हताश होऊन आपल्या उभ्या कांदा पिकात थेट मेंढ्या सोडण्याचा निर्णय घेतला. त्यांनी मेंढपाळ संभाजी कोकरे यांना अत्यल्प दरात उभे पीक चाऱ्यासाठी दिले. यामुळे एकीकडे कोकरे यांच्या मेंढ्या–शेळ्यांची चाऱ्याची गरज भागली असली तरी दुसरीकडे उमेश झेंडे यांचा संपूर्ण हंगामाचा कष्ट, वेळ आणि मोठा उत्पादन खर्च अक्षरशः वाया गेला आहे. या परिस्थितीमुळे झेंडे यांनी हळहळ व्यक्त केली असून, शेती व्यवसायातील वाढते धोके आणि अनिश्चितता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. सद्यस्थितीत पाण्याअभावी व बाजारभावातील घसरण यामुळे परिसरातील अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. शासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी केली जात आहे.



## धामणीला रामजन्म सोहळा संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** धामणी (तालुका आंबेगांव) येथील पुरातन राम मंदिरात रामनवमीनिमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करुन पंचक्रोशीतील भाविकांच्या व ग्रामस्थांच्या उपस्थितीत रामजन्म सोहळा भक्तिमय व उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. सोळाव्या शतकात येथील श्रीराम मंदिरात राम.लक्ष्मण.व सितामाईच्या मूर्तींची पुर्नप्रतिष्ठापना जगतगुरु संत तुकाराम महाराजाच्या हस्ते झालेली असल्यामुळे येथील राम मंदिरातील रामजन्म सोहळ्यासाठी वारकर्यांची व पंचक्रोशीतील ग्रामस्थांची मोठी गर्दी झालेली होती.सकाळी दहा वाजता ह.भ.प.गणेश महाराज गलांडे आळंदीकर यांचे रामजन्माचे किर्तन झाले. मंदिराच्या गाभार्यात व देवाच्या पाळण्याभोवताली



फुलांची आकर्षक सजावट करण्यात आलेली होती.भाविकांच्या व महिलांच्या गर्दीने मंदिराचा सभामंडप भरलेला होता. मुकुंद क्षिरसागर व बाळासाहेब बेरी यांनी श्रीरामाची पंचधातूची देखणी मूर्ती पाळण्यात ठेवली त्यानंतर रेश्मा बोर्हाडे.गुणवंती क्षिरसागर यांच्यासह उपस्थित महिला भाविकांनी''राम जन्मला गं सखे राम जन्मला ''हा रामजन्माचा पाळणा गीत म्हणण्यात येऊन यंदाचा रामजन्माचा सोहळा उत्साहात व आनंदात पार पडला.यावेळी भाविकांना खिचडी व केळीचा प्रसाद देण्यात आला. किर्तनकार गलांडे महाराज व वारकरी भजनी मंडळाचा आदीनाथ जाधव व पांडुरंग बोर्हाडे यांच्या हस्ते सत्कार केला. यावेळी मंजूश्री क्षिरसागर.प्रिया क्षिरसागर.मोहीनी क्षिरसागर.विद्या रायरीकर.जयश्री पुरंदरे. शुंभागी कुलकर्णी.अजेय चितळे.मंदार क्षिरसागर.विठ्ठल रायरीकर.अमेय चितळे.प्रमोद देखणे.मुरलीधर देखणे.लक्ष्मीकांत रायरीकर व देवस्थानाचे परंपरागत सेवेकरी क्षिरसागर कुटुंबिय उपस्थित होते.

## शिरूर नगरपरिषदेकडुन थकित मालमत्ता करावरील दंडात १०० टक्के सूट

### ३१ मार्च पर्यंत मुदत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर:** शिरूर नगरपरिषद क्षेत्रातील मालमत्ता धारकांसाठी एक महत्त्वाची आणि आनंदाची बातमी आहे. थकित मालमत्ता कराची वसुली प्रभावीपणे करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने शिरूर नगरपरिषदेसाठी विशेष 'अभय योजना' लागू करण्यास मान्यता दिली आहे. या योजनेअंतर्गत, जे नागरिक आपला थकित मालमत्ता कर येत्या ३१ मार्च २०२६ पर्यंत जमा करतील, त्यांना त्यांच्या करावरील शास्तीमध्ये (दंडाच्या रकमेत) १०० टक्के सूट दिली जाणार आहे. शासनाच्या नगर विकास विभागाने नुकत्याच निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार (जीआर), ही सवलत केवळ मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध आहे. वाढत्या थकबाकीमुळे अनेक नागरिकांवर दंडाचा मोठा बोजा पडला होता, तो आता पूर्णपणे माफ होणार असल्याने करदात्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**योजनेची ठळक वैशिष्ट्ये:**

१००% दंड माफी: मालमत्ता करावरील संपूर्ण शास्ती (झशपरश्रीं) माफ केली जाईल.

अंतिम मुदत: या योजनेचा लाभ घेण्यासाठी ३१ मार्च २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

अटी: या सवलतीचा लाभ घेण्यासाठी मालमत्ता धारकांनी नगरपरिषदेकडे विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.

**मुख्याधिकाऱ्यांचे आवाहन:**

शिरूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी जनतेला आवाहन केले आहे की, ''ही शासनाने दिलेली सुवर्णसंधी आहे. भविष्यात अशा स्वरूपाची कोणतीही सवलत पुन्हा दिली जाणार नाही, असे शासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे शिरूरच्या विकासात आपला हातभार लावण्यासाठी आणि दंडाच्या रकमेतून मुक्त होण्यासाठी सर्व नागरिकांनी ३१ मार्चपूर्वी आपल्या मालमत्ता कराचा भरणा करावा.''

३१ मार्चनंतर थकित कर वसुलीसाठी महाराष्ट्र नगरपरिषदा अधिनियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे. त्यामुळे घाई करा आणि आजच आपला कर भरून 'अभय योजने'चा लाभ घ्या.



द·ख·ल



## चिचोंडी येथे श्रीराम नवमी उत्साहात साजरी

**शिराळ चिचोंडी** : पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी येथे आज सकाळी आठ वाजता चिचोंडी बाजार तळावर भव्य दिव्य श्रीरामाच्या प्रतिमेला पुष्पहार घालून महाआरती करण्यात आली यावेळी गावातील उपसरपंच आबा गरुड, संदीप दानवे, माजी पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल गायकवाड, अक्षय डोळसे, आदेश काळा पहाड, दत्तू शिंदे, अक्षय भिंगारदिवे, राम जराड, ऋषी जराड, गणेश शिंदे, अनिकेत आव्हाड, नागेश आव्हाड, आदिनाथ घाडगे, रितेश काळे, पृथ्वीराज आव्हाड, जुने र शेख, रोहित तुपे, किशोर जराड, रमेश जराड, रावसाहेब कांबळे, सोमनाथ तुपे, राजेंद्र आव्हाड विजय आव्हाड आदी मान्यवर उपस्थित होते तसेच गावातील मंदिरामध्ये भजन कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.

## डहाळे यांना देशसेवेची संधी : आ.संग्राम जगताप



**अहिल्यानगर** : प्रवर्तन संचालनालय (ईडी) मध्ये विधी अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल तसेच विधी क्षेत्रातील वैशिष्ट्यपूर्ण पीएचडी पदवी संपादन केल्याबद्दल ड. डॉ. गौरव सुनिल डहाळे यांचा अहिल्यानगर जिल्ह्यातील सराफ सुवर्णकार समाजाच्या वतीने गौरव सत्कार करण्यात आला. कमी वयात हे यश संपादन करणारे डहाळे हे जिल्ह्यातील पहिले युवक ठरले असून, त्यांच्या या यशामुळे जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

शहरातील संजोग लॉन येथे आयोजित सन्मान सोहळा आमदार संग्राम जगताप व मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी मजुर फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष दादासाहेब जगताप, श्यामशेठ देडगावकर, सराफ सुवर्णकार संरक्षण समितीचे चेअरमन उमेश बुऱ्हाडे (बारामती), विशाल वेदपाठक, स्केटिंग प्रशिक्षक प्रशांत पाटोळे, पीएचडी मार्गदर्शक ड. समीर चव्हाण, उपप्राचार्य गोकुळदास लोखंडे, ॲड. राजेंद्र सेलोत, ॲड. अनिल सरोदे,

ॲड. आशिष पाटणकर, सुरज पालबंश, जॉन पठारे, वैभव बागुल, ॲड. श्रेयश देवरे, ॲड. ललित गुंदेचा, सुभाषशेठ कायगावकर, प्रकाश लोळगे, मयूर कुलथे, नगरसेवक मयूर (बाली) बांगरे, ॲड. प्रसन्न बिंगी, अजित जगताप, राहुल टाकळकर, सुनील मंचरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## नवीपेठेतील श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव उत्साहात

**अहिल्यानगर** : श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव अत्यंत भक्तिभाव, शिस्तबद्ध नियोजन आणि उत्साहपूर्ण वातावरणात मोठ्या दिमाखात संपन्न झाला. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची प्रचंड गर्दी उसळली होती. 'जय श्रीराम'च्या घोषणांनी आणि श्रीराम जय राम जयजय राम या अखंड मंत्रजपाने संपूर्ण परिसर भारावून गेला होता. पहाटे ६ वाजता जलाभिषेक, दुग्धाभिषेक व देखण्या शृंगाराने कार्यक्रमाची मंगल सुरुवात झाली. आकर्षक फुलांची सजावट, रंगीबेरंगी विद्युत रोषणाई आणि अयोध्येच्या धर्तीवर उभारलेली सजावट यामुळे मंदिर परिसर दिव्य आणि प्रसन्न भासत होता. सकाळी मंगल आरतीनंतर भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने दर्शन घेतले. सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत सामूहिक नामजप व हनुमान चालीसा पठणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेकडो भाविक एकसुरात मंत्रोच्चार करताना दिसले. मंत्रजपाच्या गजरात वातावरण पूर्णपणे भक्तिमय झाले होते. दुपारी बरोबर १२ वाजता प्रभु श्रीरामचंद्रांचा जन्मोत्सव सोहळा पार पडताच मंदिर परिसरात टाळ्या, घंटानाद आणि जय श्रीरामच्या जयघोषाने जल्लोष उसळला.

# भोंदू खरातला 'तालिबानी' शिक्षा देऊन मारून टाका

## संभाजी भिडे गुरुजींचे खळबळजनक आवाहन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :**

नाशिकचा भोंदू बाबा अशोक खरात याने जे कृत्ये केली आहेत, ते पाहता त्याला कायद्याच्या चौकटीत न अडकवता 'तालिबानी' पद्धतीने शिक्षा देऊन थेट मारून टाकले पाहिजे, असे खळबळजनक प्रतिपादन शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक संभाजी भिडे गुरुजी यांनी केले आहे. पत्रकारांशी बोलताना त्यांनी खरातच्या अघोरी कृत्यांवर तीव्र संताप व्यक्त केला. भिडे गुरुजींच्या या विधानामुळे सोशल मीडियावर संमिश्र प्रतिक्रिया उमटत असून, भोंदूगिरीच्या मुद्द्यावरून वातावरण पुन्हा तापले आहे.

एकीकडे भिडे गुरुजींनी कठोर शिक्षेची मागणी केली असतानाच,

### आर्थिक आणि अघोरी साम्राज्याचे धागेदोरे

संभाजी भिडे यांच्या विधानानंतर सामान्य नागरिकांमधूनही खरातला कठोरात कठोर फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणी जोर धरत आहे. नाशिक पोलीस आता या प्रकरणातील इतर पीडितांचा शोध घेत असून, खरातच्या आर्थिक आणि अघोरी साम्राज्याचे धागेदोरे तपासले जात आहेत.

दुसरीकडे अशोक खरातच्या काळ्या कारनाम्यांची यादी दिवसेंदिवस लांबत चालली आहे. खरातविरोधात आता नववा गुन्हा दाखल झाला असून, एका अल्पवयीन मुलीने त्याच्यावर लैंगिक अत्याचाराचे गंभीर आरोप केले आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील मूळ रहिवासी असलेल्या या पीडित मुलीने नाशिकच्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात बुधवारी रात्री उशिरा तक्रार दिली आहे. या नवीन तक्रारीमुळे खरातच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. पीडित मुलगी काही महिन्यांपूर्वी शैक्षणिक अडचणींमुळे खरातच्या संपर्कात आली होती. माझ्याकडे दैवी शक्ती आहे, मी साक्षात शंकराचा अवतार आहे, असे भासवून खरातने या मुलीचा विश्वास संपादन केला. शैक्षणिक प्रगती आणि 'तन-मन-शांती'साठी विशिष्ट अघोरी पूजा करावी लागेल, असे सांगून त्याने या अल्पवयीन मुलीवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचे समोर आले आहे.

अशोक खरातचे अनेक महिलांसोबतचे अश्लील व्हिडिओ आधीच व्हायरल झाले आहेत. मात्र, आता एका अल्पवयीन विद्यार्थिनीने धाडस करून समोर येत त्याचा पर्दाफाश केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. खरातने अशाच पद्धतीने इतरही अनेक अल्पवयीन मुलींना आपल्या जाळ्यात ओढून त्यांचे शोषण केल्याचा संशय पोलिसांना आहे.

# श्रीगोंद्यात विकासाचा नवा अध्याय

## वेदराज डेव्हलपर्स प्रकल्पाचे भूमिपूजन




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा शहराच्या झपाट्याने वाढणाऱ्या शहरीकरणाला नवा आयाम देणाऱ्या वेदराज डेव्हलपर्स या भव्य प्रकल्पाचे भूमिपूजन गुरुवारी श्रीराम नवमीच्या शुभमुहूर्तावर उत्साहात पार पडले. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते हा सोहळा संपन्न झाला.

वृध्देश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटीचे संस्थापक चेअरमन विठ्ठलराव वाडगे यांच्या संकल्पनेतून साकारत असलेल्या या प्रकल्पात ५१ व्यावसायिक गाळे आणि ३४ निवासी फ्लॅट्स उभारले जाणार असून, तो श्रीगोंदा शहराच्या वैभवात निश्चितच भर घालणारा ठरणार असल्याचा विश्वास प्रा. शिंदे यांनी व्यक्त केला.प्रा. शिंदे म्हणाले, काही वर्षांपूर्वी शहराची मर्यादा तहसील कार्यालयापर्यंत होती; मात्र आज उपनगरांचा विस्तार झपाट्याने होत आहे.

शहरात प्रवेश करताना वेदराज डेव्हलपर्स प्रकल्प हे श्रीगोंद्याच्या प्रगतीचे प्रतीक ठरेल. तसेच, या प्रकल्पातील व्यावसायिक गाळे महानगरांच्या धर्तीवर उभारले जावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.यावेळी माजी आमदार राहुल जगताप, माजी जिल्हा परिषद सदस्या डॉ. सौ. प्रतिभा पाचपुते तसेच सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांनी प्रकल्पाचे कौतुक करत भविष्यात अशा उपक्रमांची व्याप्ती वाढविण्याची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमास नगराध्यक्षा सुनीता खेतमाळीस, माजी नगराध्यक्ष मनोहर पोटे, उपनगराध्यक्ष अलका अनभुले, नगरसेवक शहाजी खेतमाळीस, प्रशांत गोरे, अख्तर शेख, अमीन शेख यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे स्वागत शुभम वाडगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ. सायली वाडगे यांनी केले.विकास फक्त इमारतींमध्ये नसतो, तो शहराच्या स्वप्नांमध्ये असतो आणि वेदराज डेव्हलपर्स त्या स्वप्नांना आकार देत आहे.




# इंधनाअभावी कर्जत येथील बहुतांश पेट्रोल पंपाचे शटर बंद

## इंधन तुटवड्याच्या अफवेने क्षमतेपेक्षा जास्त पेट्रोल-डिझेलची खरेदी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** आखाती देशातील युद्धाचे परिणाम आता भारतातील ग्रामीण भागात ही जाणवू लागले आहेत. स्वयंपाक गॅस तुटवड्यानंतर आता पेट्रोल-डिझेलची आणीबाणीने सर्वसामान्य नागरिक आणि वाहनचालक चांगलेच त्रस्त झाले आहे. पेट्रोल-डिझेलच्या अचानक उभ्या राहिलेल्या संकटाने अनेक धावत्या वाहनांनी रस्त्यातच दम तोडला. कर्जत तालुक्यातील बहुतांश पेट्रोल पंपाचे इंधना अभावी शटर बंद झाले आहे. कोरोनानंतर प्रथमताच पंपावर इंधन संपल्याचे फलक लागले आहे.

इराण-अमेरिका इस्राइल या आखाती देशाच्या युद्धामुळे पेट्रोल-डिझेलचे दर वाढणार असून इंधन पुरवठा देखील बंद होणार असल्याच्या अफवेने कर्जत शहर आणि तालुक्यात वाहनचालकांनी पेट्रोल पंपावर तोबा गर्दी करीत क्षमतेपेक्षा जास्त इंधन भरल्याने जवळपास तालुक्यातील सर्वच पंपाचे बुधवारी संध्याकाळी इंधन संपल्याची नामुष्की ओढवली. अक्षरशः लांब-लचक रांगा लावत वाहनचालकांनी पेट्रोल-डिझेल भरले. अचानक सुटलेल्या अफवेने कर्जत तालुक्यातील सर्वच पेट्रोल पंपावर हीच परिस्थिती उदभवली. काही नागरिकांनी मिळेल त्या साधनात इंधन भरत अतिरिक्त साठेबाजी केल्याने गुरुवारी शहरातील प्रत्येक पेट्रोल पंपावर कोरोनानंतर प्रथमताच इंधन संपल्याचे फलक झळकले. अचानक उदभवलेल्या या संकटाने अनेक धावत्या वाहनांनी इंधना अभावी रस्त्यातच दम तोडल्याचे निदर्शनास आले. एकीकडे जिल्हा प्रशासन इंधन तुटवडा नसल्याचे सांगत असताना कर्जत तालुक्यातील पेट्रोल पंपाचे इंधन नसल्याने शटर बंद झाले आहे. यामुळे नागरिकांच्या प्रवासावर देखील अघोषित निर्बंध लागले आहे. त्यामुळे प्रशासनाने अतिरिक्त साठेबाजी आणि टंचाई निर्माण करणाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी सर्वसामान्य नागरिक व वाहनचालक करीत आहे.

### तब्बल सहा वर्षानंतर पेट्रोल पंपावरील रांगा पाहून कोरोनाच्या आठवणी ताज्या

कोरोना काळात सर्वसामान्य नागरिकांना अशाच पेट्रोल-डिझेलसाठी रांगा लावत इंधन भरावे लागत होते. तदनंतर तब्बल सहा वर्षांनी आखाती देशाच्या युद्धामुळे तीच परिस्थिती यावेळी उदभवली आहे. स्वयंपाक गॅस तुटवड्यानंतर केवळ अफवेच्या पेवामुळे पेट्रोल-डिझेलचे संकट उभे राहिले असले तरी सर्वसामान्य नागरिकांना मात्र याचा मोठा मनस्ताप घडत आहे.

..................................

### नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये अतिरिक्त साठेबाजी करणे टाळावे : प्रांताधिकारी पाटील

अहिल्यानगर जिल्ह्यात कुठे ही इंधन तुटवडा नसून त्याचा पुरवठा सुरळीत चालू आहे. या प्रश्नांकडे जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया स्वता लक्ष ठेवून आहेत. नागरिकांनी खोट्या अफवांवर विश्वास ठेवू नये. यासह इंधनाची अतिरिक्त साठेबाजी करू नये.

# पाथर्डीत नोकरीच्या आमिषाने 30 लाखांची फसवणूक

## बनावट नियुक्तीपत्र व नोटरी कराराने विश्वासघात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी** : तालुक्यात नोकरीच्या आमिषाने तब्बल ३० लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, बनावट कागदपत्रांच्या आधारे विश्वासार्हतेचे जाळे विणत एका दाम्पत्याची आर्थिक फसवणूक केल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, अशाच प्रकारे इतर नागरिकांनाही गंडा घातला असण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

या प्रकरणी पाथर्डी तालुक्यातील रूपेशकुमार राम बागडे आणि प्रियांका महादेव आदापुरे (रा. शिक्षक कॉलनी, माळीबाभूळगाव) या दाम्पत्याने पाथर्डी पोलिस ठाण्यात तक्रार अर्ज दाखल केला आहे. मात्र, एवढ्या गंभीर स्वरूपाच्या प्रकरणात अद्याप ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

तक्रारीनुसार, संबंधित दाम्पत्य शिक्षक पदासाठी प्रयत्नशील असताना त्यांची ओळख सुभाष माणिक खेडकर (रा. मालेवाडी, ता. पाथर्डी) याच्याशी झाली. खेडकर याने स्वतः छत्रपती संभाजीनगर येथील एका




अनुदानित शैक्षणिक संस्थेत नोकरी करत असल्याचे भासवले आणि त्या संस्थेत डी.एड.च्या दोन जागा रिक्त असल्याचे सांगत दाम्पत्याला आमिष दाखवले. विश्वास बसावा यासाठी त्याने संस्थाचालकाशी भेटही घडवून आणली.

यानंतर संस्थाचालककाकडून ३० लाख रुपयांच्या मोबदल्यात दोघांनाही शिक्षक पदावर नियुक्ती देण्याचे आश्वासन देण्यात आले. नोकरीच्या आशेने भारावलेल्या दाम्पत्याने नोव्हेंबर २०२२ ते फेब्रुवारी २०२३ या कालावधीत आरटीजीएस, ऑनलाईन व्यवहार आणि रोख स्वरूपात एकूण ३० लाख रुपये अदा केले.

विश्वास अधिक दृढ करण्यासाठी शिक्षण विभागाच्या नावाने बनावट मान्यता आदेश आणि नियुक्तीपत्र देण्यात आले. इतकेच नव्हे, तर नोटरीद्वारे करारनामा करून व्यवहाराला कायदेशीर स्वरूप दिल्याचा आभास निर्माण करण्यात आला. या सर्व प्रकारामुळे दाम्पत्याचा पूर्ण विश्वास संपादन करून त्यांची फसवणूक करण्यात आली.

दरम्यान, या घटनेमुळे पाथर्डी तालुक्यात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, अशाच प्रकारे अनेक बेरोजगार युवक-युवतींना जाळ्यात ओढले गेले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

# शैक्षणिक सहल : ए-आय तंत्रज्ञान पद्धतीने शेती




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** निर्मलाताई काकडे आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज शेवगाव येथील संगणक विभागाच्या वतीने ख तंत्रज्ञान पद्धतीने शेती या विषयावर आधारित शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. ही सहल कृषी विज्ञान केंद्र बारामती येथे घेण्यात आली.

या सहलीचा उद्देश विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती कशी केली जाते याची प्रत्यक्ष माहिती देणे हा होता.

सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी ड्रिप इरिगेशन, सेन्सर आधारित सिंचन प्रणाली, स्मार्ट शेती तंत्रज्ञान, तसेच ख तंत्रज्ञानच्या साहाय्याने पिकांचे निरीक्षण या बाबींचा अभ्यास केला.

कृषी तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना आधुनिक साधनांचा वापर करून शेती उत्पादनात वाढ कशी करता येते, तसेच पाण्याचा व खतांचा योग्य वापर कसा करावा याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे विविध तंत्रज्ञान समजून घेतले.

या सहलीमुळे विद्यार्थ्यांना शेती व तंत्रज्ञान यांचा संगम अनुभवता आला असून, त्यांच्या ज्ञानात भर पडली आहे. हा उपक्रम संगणक विभागातील प्राध्यापक कराळे सर, सातपुते सर, घोडके सर, वावरे सर, भांबरे मॅडम व इतर प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. विद्यार्थ्यांनी अशा उपयुक्त शैक्षणिक सहली भविष्यातही आयोजित कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## कुरुमकर यांचा शनिवारी सेवापूर्तीनिमित्त गौरव समारंभ

**लिंपणगाव** : नंदकुमार कुरुमकर हे शिक्षण क्षेत्रात प्रदीर्घ योगदान देत सेवानिवृत्त होत आहेत. त्यानिमित्त त्यांचा श्री व्यंकनाथ विद्यालय व जुनिअर कॉलेज लोणी व्यंकनाथ यांनी श्री कुरुमकर यांचा सेवापुर्ती व गौरव समारंभ शनिवारी २८ मार्च रोजी सकाळी ९ वाजता आयोजित केला आहे. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे अध्यक्ष व श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री राजेंद्र दादा नागवडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केला आहे. अशी माहिती श्री व्यंकनाथ विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब जठार व सेवक वृंदांनी केले आहे.

या कार्यक्रमाचे अधिक माहिती देताना प्राचार्य श्री जठार यांनी सांगितले की, या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून नागवडे कारखान्याच्या व्हाईस चेअरमन सौ मेघाताई औटी यांच्यासह प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर महासंघाचे राज्य अध्यक्ष वाल्मीक सुरासे, राज्य शिक्षकेतर महासंघाचे सचिव पाराजी मोरे, शिक्षकेतर महासंघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक समशेर पठाण, छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे निरीक्षक सचिनराव लगड ज्ञानदीप गमीण विकास शिक्षण संस्थेचे निरीक्षक बी. के. लगड यांच्यासह शिक्षण संस्थेचे सर्व विश्वस्त मंडळ व स्कूल कमिटीचे सर्व पदाधिकारी यावेळी उपस्थित राहणार आहेत असे प्राचार्य बाळासाहेब जठार यांनी सांगितले. नंदकुमार कुरुमकर यांनी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेत गेली ३८ वर्ष सेवा केली आहे. या आदर्श शिक्षण संस्थेत सेवा करत असताना संस्था, विद्यालय व विद्यार्थ्यांचे सतत हित डोळ्यासमोर ठेवून प्रामाणिकपणे आपले या संस्थेत योगदान दिले.

# धर्म रक्षणासाठी देव युगानयुगे अवतार घेत असतो : लक्ष्मण महाराज

## आळंदी श्रीक्षेत्र निघोज येथे प्रभू श्रीराम जन्मोत्सव उत्साहात



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** पारनेर तालुक्यातील जगप्रसिध्द कुंड पर्यटन क्षेत्र,श्रीक्षेत्र निघोज येथे प्रभू श्रीराम जन्मोत्सव मोठया उत्साहामधे साजरा झाला. श्रीराम जन्मोत्सवा निमित्त श्रीराम चे मंदिरा समोर अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताह काळात दररोज संध्याकाळी सात ते नऊ या वेळेमध्ये राज्यातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तने झाली. सलग ४५ वर्षापासून निघोज गावामध्ये प्रभू श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा होत असतो. आणि अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन दरवर्षी होत असते. आज प्रभू श्रीराम जन्मोत्सवानिमित्त सकाळी १० ते १२ या वेळेत, हभप, लक्ष्मण महाराज कदम शास्त्री यांची रामजान्माची किर्तनसेवा झाली.यावेळी महाराजांनी,श्रीसंत तुकाराम महाराजांच्या

धर्मरक्षावया अवतार घेसी,आपुल्या पाळीसी भक्तजना या अभंगावर सविस्तर निरूपण केले. देव भक्ताचे रक्षण करत, दुर्जनांचा संहार करतो असे महाराज म्हणाले.

सदर अभंगामधून भक्तावरील प्रेम आणि दृष्टांचा नाश्यासाठी घेतलेल्या अवताराचे वर्णन केलें आहें. आपल्या संकटात भक्तांना सांभाळण्यासाठी आणि धर्माचे रक्षण करण्यासाठी देव युगानूयुगे अवतार घेत असतो. तसेच भक्तांना त्रास देणाऱ्या आणि दुष्ट राक्षसांचा संहार देवानेच केला आहे. जीवनामध्ये गुरूला आनंद साधारण महत्त्व असून, जेव्हा बापाचा धाक नसतो तेव्हा गुरूंचा धाक असावा लागतो असेही महाराज म्हणाले. यावेळी

प्रभू श्रीराम जन्मोत्सवा निमित्त दुपारी बरोबर १२ वाजता पुष्पवृष्टी करत प्रभू श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी महिला भाविकांनी पाळणे आणि प्रभू श्रीराम यांची भक्तीगीते सादर केली. यावेळी हरिभक्त परायण लक्ष्मण महाराज कदम शास्त्री आळंदी यांचा सन्मान मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे माजी अध्यक्ष प्रभाकर शेठ कवाद यांनी केला. संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन हरिभक्त सोमनाथ महाराज वरखडे यांनी केले. खिचडी केळी आणि फळे अशा महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार, दि.२७ मार्च २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८



श्रीरामपूर येथील रामनवमी यात्रेनिमित्त प्रभू श्रीरामचंद्रांना झेंडा अर्पण करण्यासाठी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी झेंडा मिरवणूक काढली.
(छायाचित्र सुनील पांढरे)

## कामगारांचे वेतन कपात केल्यास तीव्र संघर्ष

### जितेंद्र भोसले यांचा अशोक कारखाना व्यवस्थापनाला इशारा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : अशोक सहकारी साखर कारखाना व्यवस्थापनाने कामगारांच्या वेतनात कपात करण्याचा घाट घातल्यास त्याला प्रखर विरोध केला जाईल. चुकीच्या धोरणांमुळे कारखाना आर्थिक अडचणीत आला असून, त्याचा फटका कामगारांना बसू देणार नाही. व्यवस्थापनाने असा निर्णय घेतल्यास त्यांना सभासदांच्या तीव्र रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते जितेंद्र भोसले यांनी दिला आहे. प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात भोसले यांनी कारखाना प्रशासनावर कडक शब्दांत ताशेरे ओढले आहेत.

सुमारे साडेसहा लाख टन गाळप करण्याची क्षमता असलेल्या 'अशोक'ला २०२५-२६ च्या हंगामात केवळ ३ लाख ९० हजार टनांवर समाधान मानावे लागले. इतर कारखान्यांच्या तुलनेत सभासदांना मिळणारा कमी भाव, हेच ऊस उत्पादकांनी पाठ फिरवण्याचे मुख्य कारण आहे. आम्ही यापूर्वीच व्यवस्थापनाला धोक्याची सूचना दिली होती, मात्र नेतृत्वाच्या मनमानी कारभारामुळे आज ही परिस्थिती ओढवली आहे, असे भोसले यांनी म्हटले आहे.

कारखान्याच्या आर्थिक दिवाळखोरीला व्यवस्थापनाचा अकार्यक्षमपणा कारणीभूत असल्याचा आरोप करत भोसले म्हणाले की, १०० कोटी रुपये खर्च करूनही अपयशी ठरलेला डिस्टिलरी व इथेनॉल प्रकल्प आणि ३५ कोटींचा फेल गेलेला इन्सिनरेशन बॉयलर यामुळे कारखान्यावर दरवर्षी ५० कोटी रुपयांच्या व्याजाचा बोजा पडत आहे. अशा उधळपट्टीमुळे कारखाना अडचणीत आला असताना, आता त्याचे खापर कामगारांच्या वेतनावर फोडले जात आहे.

### कामगारांना वेठबिगार समजू नका

ज्या कामगारांना कार्यकर्ता म्हणून मिरवले, आज त्यांच्याच पगार कपातीचा निर्णय घेणे हे दुर्दैवी आहे. कारखान्याचे बहुतांश कामगार हे सभासद किंवा सभासदांचीच मुले आहेत. त्यांना वेठबिगार समजू नये, असेही जितेंद्र भोसले यांनी ठणकावून सांगितले. कारखाना व्यवस्थापन आणि कामगार संघटना यांच्यात सध्या वाटाघाटी सुरू असल्या तरी, वेतन कपातीचा कोणताही निर्णय कामगारांवर अन्याय करणारा ठरेल, आणि तसे केल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

## सोशलमिडियावरून मैत्री तरुणीवर अनेक वेळा अत्याचार !

### राहुरीत गुन्हा ; आरोपी पसार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : फेसबुक, इंस्टग्रामवरुन मैत्री झाली, नंतर मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले. त्यानंतर आरोपीने कॉलेज तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तीच्यावर अनेक वेळा बलात्कार केल्याची घटना राहुरी तालूक्यातील एका गावात उघडकीस आली. या घटनेतील एक २० वर्षीय कॉलेज तरुणीची सुमारे एक वर्षापूर्वी फेसबुकच्या माध्यमातून आरोपी तरुणा बरोबर ओळख होऊन मैत्री झाली. त्यानंतर आरोपीने तरुणीला त्याचा इंस्टग्राम आय डी दिला.

त्यावर दोगेजण बोलु लागले. नंतर मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले, दोघांच्या भेटीगाठी वाढल्या. दि. ८ मार्च २०२५ रोजी सकाळी आरोपीने त्या तरुणीला त्याच्या घरी बोलावून घेतले. आणि तीच्याकडे शारीरिक संबंधाची मागणी केली. तरुणीने त्याला नकार दिला असता तरुणाने बोल बच्चन करुन तीच्या इच्छे विरुध्द तीच्या सोबत बळजबरीने शारीरिक संबध केले. त्यानंतर कॉलेज तरुणी आरोपीला म्हणाली आपण लग्न कधी करायचे? तेव्हा आरोपी म्हणाला कि, मला इलेक्शनसाठी उभा राहियचे आहे, इलेक्शन झाले की त्यानंतर आपण लग्न करू. त्यानंतर आरोपीने अनेक वेळा तरुणीशी शारीरिक संबंध केले. दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास त्याच्या घरात तरुणी सोबत बळजबरीने शारीरिक संबंध केले.

त्यानंतर काही दिवसांनी आरोपी सदर तरुणीला म्हणाला मला तुझ्या सोबत लग्न करायचे नाही, मी दुसऱ्या मुली सोबत लग्न करणार आहे. तु यापुढे माझ्या सोबत बोलत जावु नकोस. असे म्हणुन आरोपीने तरुणी सोबत बोलणे बंद केले. तसेच त्याने तरुणीचे फेसबुक, इंस्टग्राम आणि फोन नंबर ब्लॉक करुन टाकले. संतप्त झालेल्या कॉलेज तरुणीने राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दाखल केली. तीच्या फिर्यादीवरून आरोपी निखील रोहिदास कुसमुडे, रा. वांबोरी, ता. राहुरी. याच्यावर गुन्हा रजि. नं. २७२/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ६४, ६४ (२) (डी), ६९ प्रमाणे बलात्कार तसेच विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक गणेश वाघमारे, पोलीस हवालदार रविंद्र कांबळे आदि पोलिस पथकाने घटनास्थळी हजर राहुन घटनेची माहिती घेतली. आरोपी निखील रोहिदास कुसमुडे हा पसार झाला असून पोलिस पथकाकडून त्याचा शोध सुरु आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक गणेश वाघमारे हे करीत आहेत.

## मंगळापुरात बिबट्याचा हल्ला; संजय वाळे जखमी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : मंगळापुर येथील संजय माधव वाळे यांच्यावर रात्री बिबट्याने हल्ला केल्याची घटना घडली असून यात ते जखमी झाले आहेत. ही घटना रात्री सुमारे दहाच्या सुमारास वाळे वस्तीवर घडली. मिळालेल्या माहितीनुसार, जेवणानंतर घराबाहेर बसलेले असताना बिबट्या अचानक घराजवळ आला. वाळे यांनी त्याला हाकलण्याचा प्रयत्न केला; मात्र काही वेळाने पुन्हा परत येत बिबट्याने त्यांच्यावर झडप घातली. या हल्ल्यात त्यांच्या हाताला गंभीर जखम होऊन टाके घालावे लागले असून शरीरावर इतरही जखमा झाल्या आहेत. आरडाओरड झाल्यानंतर घरातील सदस्य बाहेर आल्याने बिबट्या तेथून पसार झाला. जखमी वाळे यांना तातडीने घुलेवाडी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक मान्यवरांनी रुग्णालयात भेट देऊन विचारपूस केली. दरम्यान, संगमनेर तालुक्यात बिबट्यांचा वावर वाढत असून हल्ल्यांच्या घटना वाढल्या आहेत. त्यामुळे मंगळापुर परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरे लावावेत व वन विभागाने गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## राहुरीत महिलेची गाडी अडवून विनयभंग; पाच जणांवर गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : स्कुटीवरून जात असलेल्या ३८ वर्षीय महिलेची गाडी अडवून विनयभंग व मारहाण केल्याची घटना तांदुळवाडी परिसरात घडली. याप्रकरणी पाच जणांविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १७ मार्च रोजी रात्री सुमारे ८ वाजता संबंधित महिला स्कुटीवरून जात असताना आरोपी अमोल उर्फ नाना सोनवणे याने तांदुळवाडी गावठाण परिसरात तिची गाडी अडवली. त्यानंतर शिवीगाळ करत हात धरून साडी व ब्लाऊज ओढत विनयभंग केला. दरम्यान, महिलेचे पती तेथे आल्यानंतर इतर आरोपीही जमले व सर्वांनी महिलेला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. पतीवर कोयत्याने हल्ला करण्याचाही प्रयत्न करण्यात आला.

तसेच महिलेच्या गळ्यातील सुमारे १७ ग्रॅम सोन्याचे गंठण बळजबरीने तोडून नेल्याचा आरोप आहे. तक्रार दिल्यास खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देत आरोपी पसार झाले. पीडित महिलेच्या फिर्यादीवरून अमोल सोनवणे व इतर चार जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## घोडेगावात पेट्रोल पंपावर रात्री उशिरा गर्दी; काही ठिकाणी साठा संपला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथे रात्री उशिरा पेट्रोल पंपावर वाहनांची मोठी गर्दी उसळल्याचे चित्र पाहायला मिळाले. रात्री सुमारे ११ वाजताच्या सुमारास इंधन भरण्यासाठी नागरिकांनी मोठी रांग लावल्याने परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, काही पेट्रोल पंपांवर इंधन साठा संपल्याचे फलक लावण्यात आल्याने वाहनधारकांची गैरसोय झाली. अचानक वाढलेल्या मागणीमुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे. वाहनधारकांनी वेळेत इंधन उपलब्ध करून देण्याची मागणी करत प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.



## यात्रेत विवाहित महिलेचा विनयभंग; दोघांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : यात्रेत फिरण्यासाठी गेलेल्या ३० वर्षीय विवाहित महिलेचा विनयभंग केल्याची घटना राहुरी तालुक्यातील डिग्रस येथे घडली. याप्रकरणी दोघांविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २० मार्च २०२६ रोजी डिग्रस येथे यात्रा उत्सव सुरू होता. सायंकाळी सुमारे ७.४५ वाजण्याच्या सुमारास संबंधित महिला नातेवाईकांसह यात्रेत फिरत असताना गावातील सोसायटीजवळ आरोपी विशाल पवार याने तिच्या पाठीला हात लावून विनयभंग केला. याबाबत महिलेने जाब विचारताच आरोपीने शिवीगाळ केली. त्यानंतर दुसरा आरोपी सुहास सोनवणे याने महिलेवर मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

घटनेनंतर महिलेच्या पती व नातेवाईकांनी समजावण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी त्यांनाही शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. याप्रकरणी पीडित महिलेच्या फिर्यादीवरून दोन्ही आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## बाजारातील कर सवलतीचा तनपुरेंकडून आढावा; शेतकऱ्यांशी थेट संवाद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी येथील आठवडे बाजारात काल गुरुवार दि २६ मार्च रोजी दुपारी माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी भेट देत प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेतला. नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिकेच्या निवडणुकीदरम्यान शहर विकास आघाडीच्या वतीने बाजारात येणाऱ्या शेतकऱ्यांना नगरपरिषदेची कर पावती भरावी लागणार नाही, असे आश्वासन देण्यात आले होते. या आश्वासनाची अंमलबजावणी प्रत्यक्षात होत आहे की नाही, हे पाहण्यासाठी तनपुरे यांनी स्वतः बाजारात फेरफटका मारला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी व अनुभव जाणून घेतले. शेतकऱ्यांनीही कर सवलतीबाबतची स्थिती स्पष्ट केली. या भेटीदरम्यान राहुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, उपनगराध्यक्ष गजानन सातभाई, प्राजक्ता तनपुरे यांचे स्वीय सहाय्यक प्रकाश शेलार, विजय टापरे, सुनील राऊत तसेच नगरपरिषदेचे कर्मचारी आणि स्थानिक शेतकरी उपस्थित होते



## घरातला जुना स्टोव्ह बाहेर काढा

### केंद्र सरकारची रॉकेल वाटपास मंजुरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मुंबई** : आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीचा सामना देशातील सर्वसामान्य नागरिकांनाही बसत असून गॅसटंचाईमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. एकीकडे गॅस एजन्सीमध्ये गॅस पुरवठ्याबाबत काही नियमावली तयार करण्यात आली असून व्यावसायिक गॅस पुरवठाही बंद करण्यात आला आहे. त्यातच, आता युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने महत्त्वाचं पाऊल उचललं असून केंद्र सरकारकडून ३७ लाख ४४ हजार लिटर केरोसीनच्या वाटपास राज्याला मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे, गॅस आल्यानंत कुठेतरी कोपऱ्यात पडलेला स्टोव्ह आता पुन्हा बाहेर काढावा लागणार आहे. राज्यातील शिधापत्रिका धारकांना ३ लिटर केरोसीन मिळणार आहे.





प्रति कुटुंब किंवा शिधापत्रिका असलेल्यांना एका शिधापत्रिकेमागे ३ लिटर केरोसीन मिळणार आहे. एलपीजी तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून तात्पुरता स्वरुपात केरोसीन वाटप केले जाणार असल्याची माहिती आहे. राज्य सरकारकडून जिल्हानिहाय आवश्यक केरोसीन वितरण निश्चित केले असून मार्च-एप्रिल २०२६ मध्ये राज्यात तिन्ही सरकारी तेल कंपन्यांकडून केरोसीन वाटप केले जाणार आहे. एकूण वाटपाच्या ८५ टक्के केरोसीन पहिल्या पंधरवड्यात सोडण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत.

त्यामुळे, ज्या कुटुंबाकडे शिधापत्रिका आहे, त्यांना प्रत्येक कुटुंबास ३ लिटर केरोसीन मिळणार आहे. तर, ज्या कुटुंबाकडे शिधापत्रिका नाही असे कुटुंब देखील केरोसीन उपलब्धतेनुसार केरोसीन वितरणास पात्र राहतील. प्रतिसादाच्या अनुषंगाने श्वेतपत्रिकाधारक देखील केरोसीन मिळण्यास पात्र असतील, अशी माहिती आहे. आखाती देशातील इराण आणि अमेरिका, इस्रायल युद्धाचा परिणाम जागतिक बाजारपेठेवर होत असून तेल आणि इंधन पुरवठा अपुरा पडत असल्याचे दिसून येते. घरगुती ग्राहकांना कुठलीही अडचण भासणार नाही, यासाठी शासनाकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देखील संसदेत बोलताना कोरोनासारख्या परिस्थितीसाठी आपण सज्ज राहायला हवं असे आवाहन देशवासीयांना केले आहे. त्यातच, गॅसटंचाईच्या पार्श्वभूमीवर आता सरकारकडून केरोसीन वितरणास परवानगी देण्यात आली आहे.

## संगमनेरात श्रीरामनवमी निमित्त बजरंग दलाची शोभायात्रा



### शोभायात्रेतील प्रमुख आकर्षणे

या भव्य शोभायात्रेमध्ये सनई-चौघडा, भजनी मंडळ, गोमाता दर्शन, उज्जैन शैलीतील डमरू वादन, महादेव व दत्त मूर्ती, नवनाथांचा सजीव देखावा, महाबली हनुमान लाईव्ह शो, मोटमल बॅण्ड, खाटू श्यामजी मूर्ती, कालिका माता अवतार लाईव्ह शो, लोडली डी.जे., श्रीराम दरबार, भारत माता, पेपर ब्लास्ट, भव्य रंगोली, आकर्षक रथ तसेच तिरुपती बालाजी लाईव्ह शो आदींचा समावेश होता. अभिनव नगर (नवीन नगर रोड) येथून सुरू झालेली ही शोभायात्रा बसस्थानक, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, मोमीनपुरा, अशोक चौक, मेन रोड, सय्यद बाबा चौक, टेलिफोन चौक, नेहरू चौक मार्गे चंद्रशेखर चौकातील श्रीराम मंदिरात पोहोचली. तेथे मिरवणुकीची सांगता करण्यात आली.

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : श्रीरामनवमी निमित्त संगमनेर शहरात विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, मातृशक्ती - दुर्गावाहिनी, संगमनेर प्रखंड यांच्या वतीने भव्य आणि आकर्षक शोभायात्रा काढण्यात आली. पारंपरिक व धार्मिक वातावरणात निघालेल्या या मिरवणुकीने संपूर्ण शहरात भक्तिमय उत्साहाची लहर निर्माण केली.

नवीन नगर रोडवरील अभिनव नगर येथील प्रभू श्रीरामचंद्र मंदिरात हिंदुत्ववादी आमदार अमोल खताळ तसेच विचारवंत सोपानराव (एस. झेड. देशमुख यांच्या हस्ते महाआरती करून शोभायात्रेला प्रारंभ करण्यात आला.

या भव्य शोभायात्रेमुळे संपूर्ण शहर जय श्रीरामच्या जयजयकाराने दुमदुमून गेले होते शोभा यात्रा शांततेत पार पाडावे यासाठी पोलीस उपाधीक्षक कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

## अवैध गोवंश वाहतुकीवर पोलिसांची धडक कारवाई

### ११.२७ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यात गोवंशाची निर्दयतेने व अवैध पद्धतीने वाहतूक करणाऱ्या ट्रकवर राहुरी पोलिसांनी धाड टाकून मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत सुमारे ११ लाख २७ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटने संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, राहुरी-कोल्हार रस्त्यावरील राहुरी फॅक्टरी परिसरातून एक टाटा ट्रक (क्रमांक एम एच १२ डी.डी ९३९२) संशयास्पद स्थितीत जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

त्यानुसार थांबवून असता, पोलिसांनी ट्रक तपासणी केली ट्रकमध्ये १२गोवंश (बैल व गायी) अत्यंत अमानुष परिस्थितीत दाटीवाटीने बांधून, त्या जनावरांना कोणतीही चारा-पाणी व्यवस्था न करता कत्तलीच्या उद्देशाने नेले जात असल्याचे आढळून आले. या कारवाईत पोलिसांनी १० लाख रुपये किमतीचा ट्रक आणि १ लाख २७ हजार ५०० रुपये किमतीचे १२ गोवंश असा एकूण ११,२७,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल नदीम मोहम्मद जाफर शेख यांनी फिर्याद दिली असून आरोपी दिलीप मरीबा खाडे (रा. पळशी, ता. माण, जि. सातारा) व गिरीष सचिन जाधव (रा. सातारा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन्ही आरोपी सध्या फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. या घटनेप्रकरणी प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यासंदर्भात प्रतिबंध करण्याबाबतचा कायदा १९६० चे कलम ११(१) (ड) अंतर्गत राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २६४/२०२६ नुसार नोंद करण्यात आली आहे पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार गिते करीत आहेत.